# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. १६ ऑक्टोबर २०२४

किंमत ४ ₹


## प्रागतिक पक्षांतर्फे आज राज्यव्यापी परिषद

**मुंबई :** महाराष्ट्रातील प्रागतिक पक्षांची भव्य राज्यव्यापी परिषद बुधवारी (दि.१६) पुणे येथे आयोजित करण्यात आली आहे. हमाल भवन, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे येथे ही परिषद दुपारी १ ते ४ दरम्यान होणार आहे. सर्व प्रागतिक पक्षांच्या कार्यकर्त्यांनी या परिषदेसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. या परिषदेत येत्या विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीने पर्यायी जनताभिमुख धोरणे जाहीर करावीत आणि प्रागतिक पक्षांसोबत जागा वाटपाबाबत सन्मानपूर्वक तडजोड करावी, अशी आग्रही मागणी करण्यात येईल. महाविकास आघाडीच्या नेतृत्वासोबत चर्चा करण्यासाठी माजी आ. जयंत पाटील, आ. अबू असीम आझमी, डॉ. अशोक ढवळे व डॉ. भालचंद्र कानगो या चार सदस्यांच्या समितीची नेमणूक करण्यात आली.

## झारखंडमध्ये दोन टप्प्यात निवडणुका

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रापाठोपाठ झारखंड विधानसभेचे बिगुल वाजले आहे. झारखंडमध्ये २४ जिल्हे असून, एकूण ८१ जागांवर निवडणूक होणार आहे. यातील २८ जागा या एसटी प्रवर्ग आणि ९ जागा या एससी प्रवर्गासाठी राखीव असतील. विधानसभेचा कार्यकाळ ५ जानेवारी रोजी संपणार आहे. या राज्यात २.६ कोटी मतदार आहेत. यात १.२९ कोटी महिला तर १.३१ कोटी पुरुष मतदार आहेत. झारखंडमध्ये १३ आणि २० नोव्हेंबरला मतदानाची प्रक्रिया पार पडेल. तर, २३ नोव्हेंबरला मतमोजणी होईल, अशी माहिती केंद्रीय निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

# सक्षमीकरणासाठी महिलांनी एक व्हावे!

## चित्रलेखा पाटील यांचे आवाहन

- कुरुळ येथील क्षात्रैक्य माळी समाज हॉलमध्ये संवाद मेळावा
- हजारो महिलांची उपस्थिती; सुरक्षा, स्वावलंबन आदी विषयांवर मार्गदर्शन



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाची बांधिलकी गोरगरीब, शेतकरी, कष्टकऱ्यांशी राहिली आहे. सावित्रीबाई फुले या आपला आदर्श आहेत. अनेक अडचणींवर मात करीत त्यांनी मुलींच्या शिक्षणाचा पाया रोवला. तोच विचार घेत आपण मुलींसाठी सायकल देऊन त्यांच्या शिक्षणाला गती देण्याचा प्रयत्न केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार घेऊन पुढे जाण्याची गरज आहे. महिला बचत गटांना उभारी देण्याचा मानस आहे. प्रत्येक विभागात बचत गट उभारण्याचा प्रयत्न राहणार आहे. महिलांच्या हाताला काम देण्याचे स्वप्न आहे. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महिलांनी एक होण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी केले.

रायगड जिल्हा महिला बचतगट फेडरेशन पुरस्कृत लेक शिवबाची अंतर्गत महिला संवाद मेळावा कुरुळ येथील क्षात्रैक्य माळी समाज हॉलमध्ये मंगळवारी (दि.१५) आयोजित करण्यात आला. यावेळी चित्रलेखा पाटील बोलत होत्या.

रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा तथा अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, रायगड जिल्हा महिला बचत गट फेडरेशनच्या उपाध्यक्षा वृषाली ठोसर, संजना कीर, नगरपरिषदेच्या माजी नगरसेवक, ग्रामपंचायतीच्या आजी-माजी सरपंच, सदस्य, महिला आघाडीच्या पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, रायगड जिल्हा महिला बचत गट फेरडेशनची लोकप्रियता वाढली आहे. महिलांकडून या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. महिला एकजूट, सक्षम झाल्या पाहिजे, शिवबाच्या लेकी म्हणून पुढे चालले पाहिजे, या भूमिकेतून हा मेळावा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी •> पान २ वर


## महाराष्ट्रात एकाच टप्प्यात निवडणुका

# दिवाळीनंतर धमाका..!

## २० नोव्हेंबरला मतदान, २३ नोव्हेंबरला निकाल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

लोकसभा निवडणुकीनंतर संपूर्ण देशाचं लक्ष लागून राहिलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगानं केली आहे. त्यानुसार, महाराष्ट्रातील विधानसभेसाठी एकाच टप्प्यात दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान होईल, तर मतमोजणी दि. २३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. महाराष्ट्रातील दोन बलाढ्य पक्ष असलेल्या शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडल्यानंतर पहिल्यांदाच विधानसभा निवडणूक होत आहे. निवडणूक आयोगानं मूळ पक्ष कोणाचे हा निर्णय दिला असला तरी जनतेच्या मनात काय आहे, हे या निवडणुकीतून स्पष्ट होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्राची निवडणूक यंदा अनेकार्थांनी वेगळी ठरणार आहे. •> पान २ वर




### असा असेल निवडणूक कार्यक्रम

निवडणुकीची अधिसूचना २२ ऑक्टोबर रोजी जारी होईल. उमेदवारांना अर्ज दाखल करण्यासाठी २९ ऑक्टोबर ही शेवटची तारीख असेल. ३० ऑक्टोबरला अर्जांची छाननी होईल. अर्ज माघारीसाठी ४ नोव्हेंबर ही अखेरची तारीख असेल. तर २० नोव्हेंबरला एकाच टप्प्यात मतदान होणार असून, २३ नोव्हेंबरला मतमोजणी आणि निकाल जाहीर होईल.

### प्रचार तोफा कधी थंडावणार?

निवडणुका या येत्या महिनाभरात पार पडणार असल्याने राजकीय पक्षांकडे प्रचारासाठी खूप वेळ शिल्लक आहे. १८ नोव्हेंबरला प्रचार तोफा थंडावतील.

### महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये टक्कर

महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक यावेळी अनेकार्थांनी वेगळी आहे. यावेळी प्रथमच सहा प्रमुख पक्ष रिंगणात आहेत. त्यात भाजप, काँग्रेस, ठाकरेंची शिवसेना, शिंदेंची शिवसेना, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा समावेश आहे. मनसे आणि वंचित बहुजन आघाडी हे छोटे पक्षही आपली ताकद दाखवणार आहेत.

## २४ लाख मतदार बजावणार मतदानाचा हक्क

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहेत. रायगड जिल्ह्यातील पनवेल, कर्जत, उरण, पेण, अलिबाग, श्रीवर्धन व महाड या सात विधानसभा मतदारसंघातील २४ लाख ६८ हजार १२० मतदार २० नोव्हेंबरला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यामध्ये युवा, महिला व ८५ वर्षांवरील मतदारांची भूमिका महत्त्वपूर्ण राहणार आहे. निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले असून, ही प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी समिती गठीत करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी मंगळवारी दिली.

गतवर्षी २०१९ मध्ये ६५ टक्के मतदान झाले. यंदा मतमोजणी २३ नोव्हेंबरला होणार आहे. यावर्षी मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जनजागृती केली जाणार आहे. जिल्ह्यात •> पान २ वर

# जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला

## महाविकास आघाडीची यादी लवकरच होणार जाहीर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लोकसभेप्रमाणेच विधानसभा निवडणुकीतही महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा थेट सामना रंगणार आहे. लोकसभेच्यावेळी महाविकास आघाडीनं जागावाटप आणि उमेदवार जाहीर करण्यात आघाडी घेतली. त्याचा फायदा त्यांना निवडणुकीत झाला. आता विधानसभा निवडणुकीतही तोच पॅटर्न राबवण्याचा महाविकास आघाडीचा प्रयत्न आहे. महाविकास आघाडीचं जागावाटप ८० टक्के निश्चित झाले असून, याची घोषणा लवकरच महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून पत्रकार परिषद घेऊन करण्यात येणार आहे.

लोकसभेला शिवसेना ठाकरे गटानं महाविकास आघाडीत सर्वाधिक जागा लढवल्या होत्या. त्या खालोखाल जागा काँग्रेस, शरद पवार गटाला सुटल्या होत्या. पण, लोकसभेतील कामगिरी पाहता विधानसभेला काँग्रेसला अधिक जागा मिळणार आहेत. काँग्रेस ११९ जागा लढवेल. तर ठाकरेंची शिवसेना ८६, तर शरद पवारांची राष्ट्रवादी ७५ जागांवर लढेल. लहान पक्षांना ७ जागा सोडण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

राज्यात विधानसभेच्या एकूण २८८ जागा आहेत. •> पान २ वर

### पवार गटाला दिलासा

शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने केंद्रीय निवडणूक आयोगाकडे दोन मागण्या केल्या होत्या. त्यात तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह लहान आहे, ते मोठं करण्याची पहिली मागणी त्यांनी केली होती. तर, दुसरी मागणी त्यांनी पिपाणी (ट्रम्पेट) हे चिन्ह गोठविण्याची केली होती. पहिली मागणी आयोगाने मान्य केली असून, पवार गटाला दिलासा दिला आहे. परंतु, पिपाणी चिन्ह गोठविण्यची मागणी मात्र आयोगाने अमान्य केली आहे.

## वेध

### विवाहाची नोटरी बेकायदेशीर

**नवी मुंबई :** विवाहाचे तसेच घटस्फोटांचे लेखी करार नोटरी करणे बेकायदेशीर ठरवण्यात आलेले आहे. केंद्रीय कायदा मंत्रालयाने या संदर्भातील आदेश पारित केलेले आहे. विवाहाचे किंवा घटस्फोटांचे लेखी करार करून देणाऱ्या नोटरींवर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे. प्रेमविवाहाच्या प्रकरणात नोटरी केली जाण्याची सर्रास पद्धत दिसून येते. विविध धार्मिक ठिकाणी विवाह होतात. धार्मिक विधी झाल्यानंतर विवाहाची नोटरी केले जातात. विशेषतः पालकांच्या संमतीशिवाय होत असलेल्या प्रेमविवाहात नोटरीचा वापर होत असल्याचे दिसून येते. पण आता केंद्र सरकारने विवाह तसेच घटस्फोटांचे नोटरी करता येणार नाहीत, असे स्पष्ट आदेश काढले आहेत.

### पालघरला भूकंपाचे धक्के

**पालघर :** डहाणू, तलासरी तालुक्यातील गावांना भूकंपाचा धक्का बसल्याने पुन्हा एकदा दोन्ही तालुक्यातील गावे हादरली आहेत. तलासरी-डहाणू तालुक्यातील काही गावांना मंगळवारी दुपारी ४ वाजून ४७ मिनिटाला ३.५ रिश्टर स्केलचा भूकंपाचा धक्का बसला. त्याचा केंद्रबिंदू जमिनीखाली ५ किलोमीटर खोल, डहाणू तालुक्यातील कंक्राटीजवळ असल्याचे सांगण्यात आले आहे. मागील २०१८ पासून पालघर जिल्ह्यातील डहाणू, तलासरी तालुक्यातील गावांना भूकंपाचे धक्के बसत आहेत. गेल्या काही महिन्यांपासून भूकंप थांबले होते. मात्र, मंगळवारी दुपारी ४ वाजून ४७ मिनिटे २९ सेकंदाला भूकंपाचा सौम्य धक्का बसला.

# भाजपाकडून पाण्यासाठी राजकारण

- ऐन पावसाळ्यात पाणीटंचाई
- आंबिवलीच्या महिला आक्रमक

**। पेण । प्रतिनिधी ।**

आंबिवली ग्रामपंचायतीमधील भाजपचे उपसरपंच जगदीश पाटील यांच्या मनमानीला कंटाळून माजी सरपंच नेहा पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंबिवली गावच्या महिला आक्रमक झाल्या आहेत. धो-धो पाऊस पडत असतानादेखील आंबिवली गावामध्ये अनियमितपणे पाणीपुरवठा केला जातो. भाजपाकडून होत असलेल्या राजकारणामुळे ऐन पावसाळ्यात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून, महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे, असा आरोप नेहा पाटील यांनी केला आहे. •> पान २ वर

### पाण्यासाठी राजकारण करू नये

आम्ही गावासाठी काही तरी करतो हे दाखविण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे योग्य प्रकारे सुरू असलेली माझ्या काळातील पाणी योजना बंद करून नवीन पाणी योजना सुरू केली आहे, असा आरोप नेहा पाटील यांनी केला आहे. त्या म्हणाल्या, माझ्या कारकीर्दीत १४ व्या वित्त आयोगातून तीन लाखांची तरतूद हर घर नळासाठी केली होती. असे असताना आज सर्वसामान्यांकडून एक हजार रूपये का वसूल केले जात आहे. तसेच दरमहा पाण्याच्या नावाने ग्रामपंचायत २०० रुपये वसूल करत आहे. या गावात मोलमजुरी करणारे अनेक ग्रामस्थ आहे. त्यांनी हे पैसे काढून आणायचे? तसेच १५ ऑगस्ट रोजी पाण्यासंदर्भात ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, ग्रामसभेत गदारोळ होईल हे समजताच सत्ताधाऱ्यांनी १५ ऑगस्टची ग्रामसभा १४ ऑगस्टलाच उरकली. त्यामुळे आम्ही सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक यांच्याविरूद्ध तक्रार केली असून, त्यांच्यावर योग्य ती कारवाई व्हावी, अशी पुन्हा एकदा मागणी करत आहोत.



## सेझग्रस्त शेतकऱ्यांचे लाक्षणिक उपोषण

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

महामुंबई सेझसाठी संपादन करण्यात आलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याच्या निर्णयावर चार आठवड्यांत निर्णय देण्याच्या उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही मागील काही सुनावणी विविध कारणांमुळे जिल्हाधिकाऱ्यांनी पुढे ढकलल्या आहेत. त्याविरोधात सेझग्रस्त शेतकऱ्यांनी १५ ऑक्टोबर रोजी लाक्षणिक उपोषणाचा इशारा दिला होता. त्याप्रमाणे आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले.

या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी उरणचे माजी आमदार मनोहर भोईर, तसेच पेणचे प्रसाद भोईर उपस्थित होते. त्यांनी जिल्हाधिकारी •> पान २ वर

# अब्जावधींच्या रॉयल्टीला चुना




**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण-पनवेल परिसरात जेएनपीए बंदर, जेएनपीए सेझ, सिडको-रिलायन्सच्या संयुक्तपणे विविध प्रकल्प, कंपन्या उभारण्यात आलेल्या आहेत. काही ठिकाणी प्रकल्प उभारण्यासाठी थेट सीआरझेडचे उल्लंघन करण्यात आलेले आहे. तर, प्रकल्पांसाठी हजारो हेक्टर क्षेत्रावर माती दगडांचा भराव करण्यात आलेला आहे. मात्र, संबंधित प्रकल्पासाठी केलेल्या भरावाची आणि त्यासाठी भरण्यात आलेल्या रॉयल्टीची वन-महसूल विभागाकडे कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याची धक्कादायक तितकीच गंभीर बाब माहितीच्या अधिकारातून उघडकीस आली आहे. यामागे मोठे रॅकेट कार्यरत असून, यामुळे शासनाच्या अब्जावधी रुपयांच्या रॉयल्टीला ठेकेदार व शासकीय अधिकाऱ्यांनी मिळून चुना लावल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

> आपण नुकतीच पनवेल प्रांत अधिकारीपदाची सूत्रे हाती घेतली आहेत. या गंभीर विषयाची माहिती घेऊन वेळप्रसंगी चौकशी करण्यात येईल.
> – पवन चांडक, नवनियुक्त प्रांत अधिकारी

उरण-पनवेल परिसरात ठिकठिकाणी अनेक प्रकल्प, कंपन्या उभारण्यात आलेल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने ५२० हेक्टरमधील जेएनपीए बंदर, २६८ हेक्टर क्षेत्रावरील •> पान २ वर

## पर्यटकांच्या दिमतीला न आल्याने नाराजी

# माथेरानच्या राणीने शिरस्ता मोडला

### प्रवासी वाहतुकीची १५ ऑक्टोबरची डेडलाईन चुकवली

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

ब्रिटिश काळात सुरु केलेल्या पर्वतीय मार्गावरील नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेन दरवर्षी पावसाळ्यातील चार महिने प्रवाशांसाठी बंद होती. माथेरानच्या डोंगरात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो आणि दरडी कोसळण्याच्या भीतीने मिनीट्रेन बंद ठेवली जाते. १५ जून रोजी पावसाळी विश्रांती घेण्यासाठी जाते आणि पुन्हा १५ ऑक्टोबर रोजी ती प्रवाशांच्या दिमतीला येत असते. मात्र, यंदा माथेरानची राणी प्रवाशांच्या सेवेत आली नाही. दरम्यान, नेरळ-माथेरान नॅरोगेज मार्गावर सुरु असलेल्या दुरुस्तीच्या कामामुळे मिनीट्रेन वेळेवर सुरु झाली नाही आणि त्यामुळे चाहते नाराज झाले आहेत.

> आम्ही हिवाळ्यात दरवर्षी माथेरानला येत असतो आणि त्यावेळी मिनीट्रेनमधूनच प्रवास करून जात असतो. त्यासाठी नेरळ स्टेशन येथे लवकर पोहोचून तिकीट मिळविण्यासाठी रांगेत उभा राहत असतो. यावर्षी मिनीट्रेन अद्याप सुरु झालेली नाही आणि त्यामुळे हिवाळ्यात माथेरानला जाण्याचे आणि मिनीट्रेनमधून प्रवास करण्याचे स्वप्न भंगणार असे वाटू लागले आहे. – अर्चना राऊत,
> पर्यटक, नालासोपारा

> मिनीट्रेन आणि माथेरान हे माथेरानच्या पर्यटन व्यवसायाचे समीकरण बनले आहे. आता शटल सेवा सुरू आहे, पण नेरळ–माथेरान–नेरळ अशी मिनीट्रेन सुरू झाल्यानंतर खऱ्या अर्थाने माथेरानमधील पर्यटनाला बहर येत असतो. मिनीट्रेनची सेवा सुरू होईल, त्यावेळी नेरळ येथून सायंकाळची वस्तीची गाडी सुरू व्हावी.
> – संतोष कदम, व्यावसायिक



यावर्षी मिनीट्रेन बंद होण्याचा आणि पुन्हा प्रवाशांच्या सेवेत येण्याचा शिरस्ता मध्य रेल्वेकडून मोडला आहे. कारण, यावर्षी १५ जूनऐवजी सात जून रोजी मिनीट्रेन पर्यटक प्रवासी यांच्यासाठी बंद करण्यात आली. त्यात यावर्षी पावसाळा सात जून रोजी सुरु झाला नव्हता. तर, आजदेखील १५ ऑक्टोबर रोजी नेरळ-माथेरान मिनीट्रेनचा प्रवासी हंगाम सुरु करू शकली नाही. •> पान २ वर

## आता फडणवीसांची जिरवायचीच

### जरांगेंचे मराठा बांधवांना आवाहन

**। मुंबई । प्रतिनिधी।**



आचारसंहिता लागायच्या आधी मराठ्यांना आरक्षण मिळेल अशी आशा होती, पण देवेंद्र फडणवीसांनी मराठ्यांचा कार्यक्रम केला. आता विधानसभेत त्यांची जिरवायचीच, लोकसभेपेक्षा जास्त ताकद दाखवा, असे आवाहन मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला केले. आता कुणाच्या जागा वाढवायच्या आणि कुणाच्या कमी करायच्या हे आम्ही ठरवू, असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला. विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजताच मनोज जरांगेंने आपली रोखठोक भूमिका जाहीर केली.

मनोज जरांगे म्हणाले की, मराठ्यांना बेदखल करण्याचं काम फडणवीस यांनी केलं. कष्टकरी, कामगार, शेतकरी यांना जी अपेक्षा होती, ती आशा सरकारने संपवलीय. मराठ्यांचं आयुष्य बेचिराख करण्याचं काम फडणवीस यांनी केलं. फडणवीसांनी सत्तेचा वापर मराठ्यांच्या विरोधात केला. मराठा समाजाला आरक्षण मिळू द्यायचं नाही यासाठीच फडणवीसांनी सुरुवातीपासून खेळी केली. •> पान २ वर

# सार्वजनिक रस्ता बिल्डरांना आंदण



। उरण । वार्ताहर ।

उरण नगरपालिका हद्दीत पुनर्विकास व नवीन इमारती बांधण्याचे काम बिल्डर लॉबीकडून सुरू आहे. मात्र, हे करीत असताना बिल्डरांकडून नियमांची पायमल्ली करून मनमानीप्रमाणे सार्वजनिक व मुख्य वाहतुकीच्या रस्त्यावर कब्जा करून काम सुरू आहे, असा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. याबाबत नगरपालिका अधिकारीवर्गाकडे विचारणा केली असता ते याबाबत बोलणे टाळून आपल्याकडे कोणाची तक्रार नसल्याचे नगररचनाकार निखिल ढेरे सांगतात. यावरून कोणाची तक्रार आली तर कारवाई करणार, असे थातूरमातूर उत्तर देऊन चालढकलपणा करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

उरण नगरपालिका हद्दीत प्रशासकी कारभार असल्याने बिल्डर लॉबीने काही सत्ताधाऱ्यांना हाताशी धरून अधिकारीवर्गाकडून अनेक इमारतींना मोठमोठे टॉवर उभारण्यासाठी परवानगी घेतली आहेत. या परवानगी नियमांची पायमल्ली करून घेतल्या असल्याचे अधिकृत सूत्रांकडून समजते. त्यात खोटी कागदपत्रे सादर केल्याची धक्कादायक माहिती पुढे येत आहे. याबाबत माहितीच्या अधिकारात माहिती मागितली असता ती देण्यास टाळाटाळ केली जात आहे. नगरपालिका प्रशासनाने दिलेल्या परवानगीनुसारही इमारतींचे काम न होता. मनमानीप्रमाणे बिल्डरांकडून काम सुरू आहे. काम करीत असताना वाहतुकीसाठी मुख्य रस्ता असलेल्या रस्त्यावर अवजड वाहन उभे करीत इमारतींचे बांधकाम सुरू आहे. सदरचे काम सुरू असताना नगररचनाकार निखिल ढेरे यांना अनेकवेळा मोबाईलवर संपर्क साधूनही त्यांनी प्रतिसाद दिला नाही. यावरून नियमांची पायमल्ली सुरू असताना कोणी तक्रार केली तर त्याला उत्तर देऊ नये म्हणून टाळले जात असल्याचे उघड होत आहे.

आजच्या घडीला उरण शहरात अनेक बिल्डर लॉबीची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. यातील बहुतांश कामे ही नियमांचे उल्लंघन करून सुरू आहेत. याबाबत तक्रार करूनही नगरपालिका अधिकारीवर्गाकडून कोणतीच कारवाई केली जात नाही. भविष्यात याचे दुष्परिणाम येथील रहिवाशांना भोगावे लागणार आहे. त्याचे कोणतेही सोयरसुतक अधिकारी वर्गाना नसून, ते आर्थिक हित साधून काही वर्षांनी बदली करून जातील, अशी चर्चा येथील जनतेत सुरू आहे.

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-23/24-25 RFX 7000034195 | SITC of Additional PT bays at various S/stn under Panvel circle. **Tender Fee- Rs. 5000/-+ GST** | **Rs.164.4 Lakhs** |

**EMD 1%** of estimated cost. **Submission of bids from 15.10.2024 to 23.10.2024 up to 11:00 hrs, Opening date:-23.10.2024 @ 11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID se7200@mahatransco.in

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-52/24-25 7000034185 | Supply of testing tools at various substations under EHV (O&M) Dn Dombivali. **Tender Fee Rs. 500/- +GST** | **Rs. 11.40 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 15.10.2024 to 23.10.2024 up to 11:00 hrs, Opening date:-23.10.2024 @ 11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID **se7200@mahatransco.in**

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

पान १ वरून

## सक्षमीकरणासाठी महिलांनी एक व्हावे!

बँकेचे चेअरमन माजी आ. जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भरविण्यात आला आहे. महिला अनेक संकटांशी सामना करीत संसार, समाज चालवित आहे. तिच्यामध्ये असलेली जिद्द व सातत्यामुळे हे शक्य होत आहे.

राजकारण, अर्थकारण, समाजकारणात महिलांचे म्हणणे असावे ही भूमिका आहे. तरुण व्यसनापासून दूर राहण्यासाठी महिलांनी काम केले पाहिजे. तरच समाजात आमूलाग्र बदल होईल. पंधरा ते वीस हजार रुपये कमविण्याचे बळ महिलांना स्वतःच्या पायावर मिळाले पाहिजे. या मेळाव्यातून महाराजांचे विचार घेऊन महिलांनी पुढे जाण्याची गरज आहे. या भूमिकेतून महिलांनी काम केले पाहिजे, असे पाटील म्हणाल्या.

## महिलांनी संघटनात्मक काम करावे : ॲड. मानसी म्हात्रे




सध्या महिला सुरक्षित नाही, स्वावलंबी नाही. महिलांना रोजगार, स्वयंरोजगार नाही. ही दारे खुली करण्यासाठी संघटितपणे साखळी तयार करावी लागेल. अन्यायाविरोधात संघटितपणे लढावे लागणार आहे. महिलांना न्याय देण्याचे काम शेकापचे नेते जयंत पाटील यांच्या माध्यमातून केले आहे. त्यामुळे पाठीराखा कोण असावा याचा विचार करण्याची वेळ आली आहे. त्यासाठी संघटनात्मक काम करणे महत्त्वाचे आहे, असे आवाहन शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी केले.

त्या पुढे म्हणाल्या, गेल्या अनेक दिवसांपासून मेळावे भरविण्यात आले आहेत. या मेळाव्यातून महिलांना ऊर्जा, बळ मिळाले आहे. महिलांना संघटित करण्यासाठी संकल्पना निर्माण केली. त्या संघटनेतून ऊर्जेचा स्त्रोत निर्माण होणार आहे. त्यामुळे शिवबाच्या लेकी आता जग जिंकणार असल्याची आशा निर्माण झाली आहे. सहा महिन्यांत समाजाची परिस्थिती भयावह आहे. महिलांवर अत्याचार केले जात आहेत. महिलांना रोजगारापासून परावृत्त केले जात आहे.असंख्य महिलांना फसविले जाते. प्रत्येक निर्णयापासून महिलांना दुर्लक्षित केले जाते. महिला ज्या ठिकाणी काम करतात, त्या ठिकाणी त्यांची अडवणूक केली जाते. त्यासाठी महिलांना संघटन करण्याची गरज आहे. हजारो महिला बचतगट फेडरेशनच्या माध्यमातून काम करीत आहेत. महिलांची साखळी जोडली, तर सर्व संकटांवर मात करू शकतो. महिलांना प्रत्येक व्यवसायात हक्काची पदे द्या, हाताला कामाला द्या, सशक्त करा, निर्भय, स्वयंपूर्ण करा, ही मागणी आहे. सध्या देशात, राज्या, जिल्ह्यात महिला सुरक्षेचा प्रश्न गंभीर आहे. महिला अत्याचाराचे गुन्हे दिवसेंदिवस वाढत आहेत. महिलांची फसवणूक केली जाते. रुग्णालयात काम करणाऱ्या परिचारिकांना कायम करण्यासाठी फसवण्यात आले होते. त्यासाठी महिला एकत्र आल्या पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

## दिवाळीनंतर धमाका..!

देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय निवडणूक आयोगाची मंगळवारी (दि. १५) पत्रकार परिषद राजधानी दिल्लीत झाली. त्या पत्रकार परिषदेत महाराष्ट्र व झारखंड या दोन्ही राज्यातील विधानसभा निवडणुकांची घोषणा करण्यात आली. निवडणुकीची घोषणा होताक्षणी आचारसंहिता लागू झाली आहे. खरं तर, महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक हरियाणासोबत होणं अपेक्षित होतं. मात्र, जम्मू-काश्मीरमधील सुरक्षेचं व सण-उत्सवांचं कारण देत निवडणूक आयोगानं महाराष्ट्राची निवडणूक हरियाणासोबत घेणं टाळलं होतं.

**महाराष्ट्राकडं देशाचं लक्ष**

राज्यातील फाटाफुटीनंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे, शरद पवार व काँग्रेसच्या महाविकास आघाडीनं महायुतीला पराभवाचा दणका दिला होता. ४८ पैकी एकूण ३१ जागा मविआनं जिंकल्या होत्या. तर, महायुतीला अवघ्या १७ जागांवर समाधान मानावं लागलं. हीच कामगिरी महाविकास आघाडी विधानसभेत करून दाखवणार की महायुती त्यांना रोखणार याविषयी उत्सुकता आहे.

**प्रचाराचे मुख्य मुद्दे**

राज्यातील कायदा-सुव्यवस्था, राज्यातून बाहेर चाललेले उद्योग, बेरोजगारी, भ्रष्टाचार, सरकारी पैशाची उधळपट्टी हे मुद्दे महाविकास आघाडीकडून प्रामुख्यानं प्रचारात आणले जातील. तर, महिला व तरुणांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजना, टोलमाफी आणि पायाभूत सुविधांचा विकास हे यावर महायुतीकडून भर दिला जाईल असं दिसतं. पक्षातील फोडाफोडी हा मुद्दा जुना असला तरी तो नव्यानं चर्चेत येण्याची चिन्हं आहेत.

## २४ लाख मतदार बजावणार मतदानाचा हक्क

आदिवासी मतदार मोठ्या प्रमाणात आहेत. मतदानाच्या दिवशी त्यांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. त्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये १८ ते १९ वयोगटातील ५१ हजार ६१२, ८५ वर्षांपुढील १३ हजार ४८ तसेच अनिवासी भारतीय २३३ मतदार आहेत. जिल्ह्यातील दोन हजार ७९० मतदान केंद्रांमध्ये मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. ही प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्ह्यात बॅलेट युनिट सहा हजार २००, कंट्रोल युनिट तीन हजार ४०५ व व्हीव्ही पॅट तीन हजार ६८१ असे एकूण १३ हजार २८६ मशीन असून, १७ हजार २४९६ कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. ८५ वर्षांवरील व ४० टक्के दिव्यांग व्यक्तींच्या घरी जाऊन मतदान करून घेतले जाणार आहे. दिव्यांग मतदारांसाठी व्हीलचेअरची सुविधा करण्यात येणार आहे. तसेच सोशल मीडियावर ही करडी नजर ठेवली जाणार असल्याची माहिती जावळे यांनी दिली. आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचेही ते म्हणाले.

**विधानसभा मतदारावर दृष्टीक्षेप**

| मतदार संघ | पुरुष | महिला | तृतीय पंथ | एकूण मतदार |
|---|---|---|---|---|
| पनवेल | ३४३५११ | ३०२३३३ | ७३ | ६४५९१७ |
| कर्जत | १५८३९४ | १५८२०६ | ०३ | ३१६६०३ |
| उरण | १६८७१२ | १६७५०१ | १२ | ३३६२२५ |
| पेण | १५४०२९ | १५२५३२ | ०० | ३०६५६१ |
| अलिबाग | १४९४७४ | १५४१२२ | ०१ | ३०३५९७ |
| श्रीवर्धन | १२९४३६ | १३४४८५ | ०० | २६३९२१ |
| महाड | १४६७०० | १४८५९६ | ०० | २९५२२६ |
| एकूण | १२,५०२५६ | १२,१७७७५ | ८९ | २४,६८१२० |

## भाजपाकडून पाण्यासाठी राजकारण

माजी सरपंच नेहा प्रशांत पाटील यांच्या कारकीर्दीमध्ये आंबिवली ग्रामपंचायतीमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली होती. त्या योजनेंतर्गत आंबिवली ग्रामस्थांना हर घर नळ नेण्यासाठी पैशांचा भुर्दंड पडू नये म्हणून १४ व्या वित्त आयोगांतर्गत तीन लाखांची तरतूद करून हर घर नळ पोहोचवले होते. त्यावेळी कधीही गावातील महिलांना पाण्याची समस्या आली नाही. कारण, तत्कालीन सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांनी स्वतःच्या गावासाठी पाण्याची व्यवस्था विहिरीत स्त्रोत उत्पन्न करून केली होती. या विहिरीला पाणी बारामही असल्याने कधीच पाणीटंचाई जाणवली नाही. परंतु, स्वतःची पाठ थोपटून घेण्यासाठी उपसरपंच जगदीश पाटील यांनी व्यवस्थित सुरू असणारी जलजीवन योजना बंद आहे असे दाखवून नव्याने पाणी योजना जिते येथून पाईप जोडून सुरू केली. परंतु, ती योजना पूर्णतः चुकीच्या पद्धतीने राबवल्यामुळे आता आंबिवली गावात योग्य प्रकारे पाणीपुरवठा होत नाही, त्यामुळे ऐन घातीच्या काळात महिलांचे हाल होत असल्याने त्या आक्रमक झाल्या आहेत. त्यातच उपसरपंच जगदीश पाटील हे आंबिवली गावात राहात नसल्याने त्यांना आंबिवली गावातील आयाबहिणींची व्यथा समजत नाही, असेही आक्रमक झालेल्या महिलांचे म्हणणे आहे. यावेळी ग्रामपंचायतीचे माजी सदस्य प्रशांत पाटील, वासुदेव पाटील, गणेश पाटील, धनाजी पाटील, दिपक पाटील, रोशन पाटील, सोनाली पाटील, सुवर्णा घरत तसेच मोठ्या प्रमाणात महिला व ग्रामस्थ हजर होते.

## जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला

यातील २२२ जागांवर महाविकास आघाडीत एकमत झालं आहे. मुंबईतील २३ जागा ठाकरे गटाला, ८ जागा काँग्रेसला, १ जागा समाजवादी पक्षाला सोडण्यात येणार आहे. यावर सहमती झालेली आहे, अशी खात्रीलायक सूत्रांकडून सांगण्यात आले. मुंबईतील ४ जागांवर तिन्ही प्रमुख पक्षांत रस्सीखेच आहे. या जागांबद्दलचा निर्णय लवकरच घेण्यात येईल. मुस्लीमबहुल जागांवर काँग्रेस, ठाकरे गटाचा दावा आहे, असेही बोलले जात आहे.

## अब्जावधींच्या रॉयल्टीला चुना

जेएनपीए सेझ,१२५० हेक्टर जमिनीवर सिडको-रिलायन्सने संयुक्तपणे उभारलेला सेझ प्रकल्प, पनवेल परिसरात १९००० हेक्टर क्षेत्रावर उभारण्यात येत असलेला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि इतर काही कंपन्यांचाही समावेश आहे. उरण-पनवेल परिसरात उभारण्यात आलेल्या या विविध प्रकल्प उभारण्यासाठी हजारो हेक्टर खाजण, कांदळवन आणि नैसर्गिक सखल क्षेत्रात भरावासाठी माती दगडांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला आहे. खोदकामे केली आहेत. परंतु, या कोणत्याही प्रकल्पांच्या कामासाठी ना प्रकल्पधारकांनी, ना ठेकेदारांनी कोणत्याही प्रकारच्या शासकीय परवानग्या घेतलेल्या दिसून येत नाहीत. कायदेशीररित्या परवाना न घेताच सीआरझेड कायद्याचा भंग करीत सदर भराव अनधिकृतपणे घालून सरकारची अब्जावधी रुपयांची रॉयल्टी बुडविण्यात आली आहे. तसेच प्रकल्प उभारण्यासाठी हजारो ब्रास माती दगडांचा भराव करताना तो भराव कुठून उपलब्ध करण्यात आला, त्यासंदर्भातदेखील कुठलीच माहिती उपलब्ध नाही. यावरून उरण-पनवेल परिसरात महसूल व वन आदी शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांचा कशा प्रकारे अनागोंदी कारभार सुरू आहे, याचा प्रत्यय देणारी ही गंभीर बाब उघडकीस आली आहे. या अत्यंत गंभीर विषयाकडे राज्य सरकारही जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे.

**उरण-पनवेलमधील प्रकल्पांसाठी हजारो हेक्टर क्षेत्रावर झालेल्या माती दगडाच्या भरावाची प्रकल्पधारक आणि ठेकेदारींनी अब्जावधी रुपयांची रॉयल्टीच भरलेली नाही. प्रकल्पधारक आणि ठेकेदारींनी अब्जावधींची रॉयल्टी बुडवून शासनाला चुना लावला आहे. शासनाकडून दुर्लक्षित करण्यात आलेल्या या गंभीर विषयावर लक्ष वेधण्यासाठी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागविण्यात आली होती. मात्र, जनमाहिती अधिकारी बालाजी देशमुख यांनी रॉयल्टी वसुलीबाबत अभिलेखात कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचे लेखी उत्तर दिले आहे.**

**- नंदकुमार पवार, पर्यावरणवादी**

## सेझग्रस्त शेतकऱ्यांचे लाक्षणिक उपोषण

यांना शेतकऱ्यांच्यावतीने निवेदन दिले. जिल्हाधिकारी यांनी लवकरात लवकर निकाल द्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले आले. सदरचा निकाल देताना त्यास आचारसंहितेची काहीच बाधा येणार नाही, असेदेखील सांगितले. या उपोषणाला पेण, पनवेल, उरण तालुक्यातील सुमारे २०० ते २५० शेतकरी उपस्थित होते.

## माथेरानच्या राणीने शिरस्ता मोडला

पावसाळी सुट्टीसाठी गेलेली मिनीट्रेन हिवाळी पर्यटन हंगामासाठी वेळेवर सज्ज झाली नसल्याने पर्यटकांनी नाराजी व्यक्त केली आहे. नेरळ-माथेरान-नेरळ मार्गावर पूर्वी किमान चार ते पाच फेऱ्या चालविल्या जात होत्या. मागील दोन वर्षी या मार्गावर केवळ दोनच फेऱ्या चालविण्यात आल्या होत्या. त्यामुळेदेखील पर्यटकांनी नाराजी व्यक्त केली होती. आज वेळेवर मिनीट्रेनची प्रवासी वाहतूक सुरु झाली नसल्याने माथेरानच्या डोंगरातील हिरवे गवत पाहण्याची संधी हुकली आहे.

मंगळवारी १५ ऑक्टोबरपासून मिनीट्रेनचा पर्यटन हंगाम सुरु होत असतो. मात्र, नेरळ-माथेरान-नेरळ मार्गावर सध्या नॅरोगेज मार्ग दुरुस्तीची कामे सुरु आहेत. त्यामुळे मिनीट्रेनची प्रवासी वाहतूक सुरु झाली नाही. मात्र, पुढील काळात कोणत्या तारखेला मिनीट्रेन सुरु होणार याबद्दलदेखील कोणतीही माहिती मध्य रेल्वेच्या जनसंपर्क कार्यालयाकडून देण्यात आलेली नाही. तर, दररोज नेरळ येथून मालवाहू गाडी चालवली जात असतानादेखील मिनीट्रेनचा प्रवासी हंगाम सुरू झालेला नसल्याने पर्यटक आणि माथेरानमधील व्यावसायिक नाराजी व्यक्त करीत आहेत.

## आता फडणवीसांची जिरवायचीच

या मराठ्यांची पोरं आरक्षणासापासून, शिक्षणापासून, नोकरीपासून वंचित राहिली पाहिजेत, अशा पद्धतीने देवेंद्र फडणवीस मराठ्यांसोबत वागले. सामाजिक चळवळीत वैचारिक मतभेद असू शकतात; पण मराठा समाज एक ठेवायचा नाही, मराठा समाजाच्या पोरांना आरक्षण न देता भिकारी ठेवण्याचं काम फडणवीस यांनी केलं. देवेंद्र फडणवीस द्वेषाने वागले. मराठ्यांच्या शेपटावर त्यांनी पाय ठेवला. सरकारने जाणूनबुजून आपल्याला बेदखल करत आपला अपमान केला आहे, असा आरोप मनोज जरांगे यांनी केला. ते म्हणाले की, आपण आता पक्कं ठरवायचं, त्यांची जिरवायचीच. आता लोकसभेपेक्षा जास्त ताकद दाखवा. आपल्या प्रतिष्ठेची वेळ आलीय. अशी लाट पुन्हा येणार नाही, यावेळेस ताकद दाखवावी लागेल. देवेंद्र फडणवीस यांनी मराठ्यांचा कार्यक्रम लावला. ज्या मराठ्यांनी १०६ आमदार दिले, त्याच मराठ्यांवर तो उलटला. यावेळी मतं विकू देऊ नका. ते योग्य ठिकाणी वापरा.

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

। रसायनी । वार्ताहर ।

शिवशाही प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य व युवा फ्रेंडस् सर्कल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसीलगतच्या डोंगराळ भागातील वडमाळवाडी येथे शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शिवशाही प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष राज गोविंद जाधव उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात शिवशाही प्रतिष्ठान रायगड जिल्हा अध्यक्ष यश इंगवले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शिवशाही प्रतिष्ठान रायगड जिल्हा संघटक नितेश देशमुख यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

शिवशाही प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष राज गोविंद जाधव यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. वडमाळवाडी शाळेचे शिक्षक मंगेश कांबळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सामाजिक कार्यकर्ते महाराष्ट्र भूषण पत्रकार कैलासराजे निर्मला कमलाकर घरत संस्थापक अध्यक्ष युवा फ्रेंडस सर्कल फाऊंडेशन यांच्या नियोजनातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिते केंद्रप्रमुख मुकुंद पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवतेज युवा फाउंडेशनचे अध्यक्ष हेमंत पाटील होते. यावेळी अभिमन्यू म्हात्रे, माधुरी घरत, सुचित्रा समेळ, अनिता वाघे, सविता वाघे, साहिल इंगवले, लक्ष्मण पाटील, साहिल थळे पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

**पाहिजेत**

| अ. क्र. | पद | पात्रता | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | लेखनिक | पदवीधर (वाणिज्य) पदवीधरास (प्राधान्य) व MSCIT संगणक परीक्षा उत्तीर्ण, मराठी टायपिंग | १ | रू. ४०४० अधिक शासकीय दराने महागाई भत्ता व घरभाडे भत्ता |

उमेदवाराने दि. २३/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता पतसंस्थेच्या वरील पत्त्यावरील कार्यालयामध्ये मुलाखतीस उपस्थित राहून त्याच दिवशी स्वहस्ताक्षरामध्ये अर्ज लिहून सादर करावयाचा आहे. टपालाद्वारे प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. सोबत मूळ दाखले व त्यांच्या सत्यप्रती आणाव्यात. तसेच पासपोर्ट साईज फोटो अर्जासोबत आणावा.

सही
ॲड. जे.टी. पाटील
अध्यक्ष
जनसेवा नागरी सह. पत. मर्या; अलिबाग

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

**ज.म. र अर्ज २०/२०२४**

**जाहिर नोटीस**

प्रति,
**श्री. राजेंद्र गंगाराम घरत**
रा. कुंठ्याची गोठी, पो. बामणगाव — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत बामणगाव,
ता. अलिबाग, जि. रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे कुंठ्याची गोठी, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचा श्री. राजेंद्र गंगाराम घरत यांचा जन्म दि. ०१/०७/१९७७ रोजी मौजे कुंठ्याची गोठी, येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत बामणगाव येथे केलेली नसल्याने त्यांचा जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत बामणगाव यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.२०/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग — सही/-
तारिख : २०/०९/२०२४ — **(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

**Change of Name**

I have changed my Old Name SHIVLING SHIVAPPA BAKLINGE to New Name SHIVALING SHIVAPPA BAKLINGE, A/p. A-106, Pal Tower, Bhisegaon, Karjat-410201, Raigarh. MH. Mob. 9767244376

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (SRM Tender) from registered contractors/suppliers on Mahatransco SRM E-Tendering portal for following works under EHV O&M Circle, Kolhapur.**

**Name of work :**SRM Tender for Work of Tower Leg re-earthing by providing and fixing Counterpoise and Pipe type earthing to legs of EHV towers of various EHV lines, under EHV O&M Division Ratnagiri (3rd call).

1. **RFx No.-** 7000033760
2. **Estimated cost:** Rs. 85,29,388/- (Including Taxes)
3. **E.M.D.:-** Rs. 85,294/- By Online Payment
4. **Tender Fee:-**Rs 590/- By Online Payment
5. **Date of Submission:-** Up to Closing date i.e. 21/10/2024 at 23:59 Hrs.
6. **Date of opening (Tech. bid):-** 22/10/2024 at 12:30 Hrs. onwards; if possible.

**For further details visit our website https://mahatransco.in/**

Note :- All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal (**https://srmetender. mahatransco.in**).

**(Save the Energy)** **Sd/-**
**Superintending Engineer, EHV O&M Circle, Kolhapur**

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-57/24-25 7000034126 | Work of chemical resistant coating of ICT at 220kV Apta, 220kV Taloja & 100kV Thal substation, under EHV (O&M) Dn. Panvel under EHV (O&M) Circle, Panvel. Tender Fee **Rs. 500/- +GST** | **Rs. 32.50 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 14.10.2024 to 21.10.2024 up to 11:00 hrs, Opening date:-21.10.2024 @ 11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID **se7200@mahatransco.in**

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

# रिक्त पदांमुळे कर्मचाऱ्यांची तारेवरची कसरत

## शेतकरी कक्षाला अल्प प्रतिसाद

**। अलिबाग । प्रमोद जाधव।**
**शेतकऱ्यांना चिंतामुक्त करण्यासाठी कृषी विभागामार्फत शेतकरी सन्मान व मार्गदर्शन कक्ष चार वर्षापुर्वी सुरु करण्यात आले होते. रायगड जिल्ह्यात या कक्षाचे उद्घाटन मोठ्या थाटामाटात करण्यात आले होते. परंतु, या कक्षाला अल्प प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. अपुऱ्या मनुष्यबळामुळे या कक्षाच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत पोहचण्यास कृषी विभागाला अपयश आले आहे.**




तालुक्यासह जिल्ह्यातील कृषी कार्यालयामध्ये शेतकरी येत असतात. त्यांना विविध योजनांची माहिती देतानाच त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी एक खिडकी तत्वावर शेतकरी सन्मान व मार्गदर्शन कक्ष सुरु करण्यात आले होते. संबंधित अधिकारी व विभागामार्फत शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेण्याबरोबरच त्यावर उपाययोजना करण्यासाठी हे कक्ष सुरु करण्यात आले. या कक्षामध्ये स्वतंत्र बैठक व्यवस्थेसोबत पिण्याचे पाणी, शेतीविषयक पुस्तके, विविध योजनांची माहिती पुस्तके ठेवण्यात आली आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी हे कक्ष फायदेशीर ठरेल, अशी आशा शेतकऱ्यांना होती. परंतु, नव्याचे नऊ दिवस या उक्तीप्रमाणे कृषी विभागाचा कारभार चालत आहे.

### शेतकऱ्यांची फार मोठी निराशा

**रायगड जिल्ह्यामध्ये सुमारे ९८ हजार हेक्टर भात पिकांचे क्षेत्र असून सुमारे १४ हजार हेक्टर आंब्याचे क्षेत्र आहे. भात पिकांबरोबरच आंबा, काजू या फळपिकांची लागवड शेतकरी मोठ्या प्रमाणात केली जाते. तसेच, भाजीपाला लागवडीवरदेखील भर दिला जात आहे. या कक्षातून त्यांना न्याय मिळेल अशी आशा या शेतकऱ्यांना होती. परंतु, शेतकऱ्यांची फार मोठी निराशा झाल्याचे चित्र आहे.**

रायगड जिल्ह्यात उभारण्यात आलेल्या कक्षामध्ये कृषी उपसंचालक काळभोर होते. त्यांची बदली झाल्यावर हे पद रिक्त राहिले आहे. यामुळे गेल्या अडीच वर्षापासून शेतकरी सन्मान व मार्गदर्शन कक्षाचा कारभार बिनभरोसे चालत आहे. जिल्ह्यात गेल्या दोन वर्षापासून कृषी अधीक्षक, कृषी उपसंचालक तसेच तंत्र अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याने या कक्षामार्फत सेवा देताना कर्मचाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. यामुळे या कक्षाला अल्प प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.

> **शेतकरी सन्मान व मार्गदर्शन कक्षामार्फत शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न आहे. तालुका कृषी अधिकारी व जिल्हा कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाते. शेती शाळा घेऊन त्याचा प्रचार व प्रसारदेखील केला जातो. परंतु, सध्या महत्वावी पदे रिक्त असून उपसंचालक व तंत्र अधिकारी यांची पदे भरण्यात आली आहेत.**
> **– सुरेश बोऱ्हाडे, कृषी उपसंचालक**

# शेकापचे झाड लावून आंदोलन

**। पनवेल । वार्ताहर ।**
निवडणुकीचे वेध लागताच पनवेल महानगर पालिकेने करोडो रुपयांच्या कामाचा शुभारंभ करण्याचा तगदा सुरु केला आहे. मात्र, अनेक वर्ष रस्त्यांची होत असलेली भयानक अवस्था पाहायला पालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याला वेळ मिळाला नाही. खांदा वसाहतीच्या मुख्य खड्डेमय रस्त्यावरूनच दरवर्षी गणरायाचे आगमन व विसर्जन होत आले आहे. तसेच, या खड्ड्यात अनेक दुचाकींचा अपघात झाला असून चालकांना गंभीर त्रासांचा सामना करावा लागत आहे. खड्ड्यांमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे खांदा वसाहतीच्या आजू बाजूच्या परिसरातील नागरिक हैराण झाले आहेत. याकरीता खांदा वसाहतीतील शेकाप कार्याध्यक्ष महादेव वाघमारे यांनी खांदा वसाहतीतील मुख्य रस्ता



खड्डेमुक्त करण्यासाठी पनवेल पालिके सोबत पत्र व्यवहार केला होता. तसेच, हा रस्ता लवकरात लवकर खड्डेमुक्त झाला नाहीतर याच खड्ड्यात झाड लावून आंनदोलन करण्याचा इशारा पालिकेला देण्यात आला होता.

दरम्यान, पनवेल खड्डेमुक्त करण्यासाठी पालिकेकडून करोडोंचा खर्च करण्यात आला होता. मात्र, तरीदेखील येथील मुख्य रस्त्यांची परिस्थिती जैसेथेच आहे. यामुळे मंगळवारी (दि.१५) शेकापच्यावतीने खांदा वसाहतीच्या मुख्य रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यात झाडे लावून आंदोलन करण्यात आले. यावेळी शेकापचे महादेव वाघमारे तसेच गणेश पाटील व महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# अलिबागेत 'स्वरगंध' कार्यक्रमाचे आयोजन

**। अलिबाग । वार्ताहर ।**
मैफिल अलिबाग या संस्थेतर्फे कोजागरी पौर्णिमेंनिमित्त बुधवारी (दि.१६) सायंकाळी ७ वाजता आरसीएफच्या कुरूळ वसाहतीत सुप्रसिद्ध युवा गायक शमिका भिडे आणि धनंजय म्हसकर यांचा 'स्वरगंध' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

कोजागरीनिमित्त गेली कित्येक वर्षे मैफिल अलिबागतर्फे दर्जेदार सांगीतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. या सांगीतिक कार्यक्रमांची अलिबाग परिसरातील संगीत रसिकांना नेहमीच उत्सुकता असते. यावर्षीच्या कोजागरीला झी मराठी सारेगमप लिटल चॅम्प्स २००८ मधून घरा घरात पोहचलेली शमिका भिडे आणि बंदिश बँडीट या वेबसेरीजचा पार्श्वगायक धनंजय म्हसकर सादर



करीत असलेला बहुचर्चित 'स्वरगंध' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे कार्यक्रम मैफिल अलिबागच्या सदस्यांसाठी असला तरी अलिबाग परिसरातील संगीतप्रेमी रसिकांनी कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी उदय जोशी (९९२१९२४५००) किंवा भालचंद्र देशपांडे (८८८८५०००२५) यांच्याशी संपर्क साधावा.

# अंगणवाडीचे बांधकाम प्रलंबित

**। पाली । वार्ताहर ।**
सुधागड तालुक्यातील अपूर्ण बांधलेल्या अंगणवाडीबाबत नागरिक वारंवार तक्रारी करीत आहेत. जांभूळपाडा येथील अंगणवाडीचे काम सुरू झाले असून लवकरच बालकांना हक्काची अंगणवाडी मिळेल असे चित्र आहे. याबाबत वारंवार येणाऱ्या बातम्या बघून रासळ ग्रामपंचायतीतील वावे गावातील अंगणवाडीचे काम देखील अपूर्ण असल्याचे एका सजग नागरिकाने कळविले आहे. ठेकेदार कोण आहे याची नागरिकांना कल्पना नसून याबाबत लक्ष घालण्यासाठी नागरिकांनी विनंती करण्यात आलेली आहे.

या अंगणवाडीचे काम वर्षभर प्रलंबित असल्याचे येथील एका सजग नागरिकाकडून सांगण्यात आले आहे. परंतु, या अंगणवाडीचा ठेकेदार कोण, हा शोध घेण्याचा विषय आहे. हे काम करणारा किंवा याचे काम पाहणारा माणूस गावातलाच असल्याने त्याच्या विरोधात तक्रार



करण्यासाठी नागरिक पुढे येण्यास कचरत आहेत. तसेच, या अंगणवाडीचे बांधकाम करणारा ग्रामपंचायत सदस्य असल्याची चर्चा होत आहे. धक्कादायक गोष्ट म्हणजे, या कामासंबंधित कागदपत्रे पंचायत समितीकडे उपलब्ध होत नसल्याची बाब गटविकास अधिकाऱ्यांनी सांगितली आहे. तसेच, पंचायत समितीच्या माजी बांधकाम अधिकाऱ्याच्या मुलीनेच एका अंगणवाडीच्या बांधकामाचा ठेका घेतल्याचे समोर येत आहे. तिचे लग्न झाल्यानंतर आडनाव बदलल्याने त्याचाच फायदा संबधीत बांधकामे आपल्या नातेवाईकांना मिळवून देण्यासाठी अधिकारी ठका घेत असतात.

## 'वाचन प्रेरणा दिवस'

**म्हसळा** : रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा म्हसळा येथे देशाचे माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. रा.जि.प. प्राथमिक मराठी शाळा म्हसळा येथे वर्षभर अनेक विधायक आणि विदयार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला वाव मिळेल असे उपक्रम विदयार्थी आणि पालक यांच्या समन्वयातून साजरे करतात. यापूर्वी विद्यार्थ्यांना लघुउद्योगाचे धडे, शाडूच्या मूर्तिचे महत्व, टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू बनविणे, मातीच्या सुंदर व आकर्षक वस्तू बनविण्याची कार्यशाळा शाळेत घेतल्या जातात.

# माथेरानचे भूमिपुत्र समस्येंच्या गर्तेत

**। माथेरान । वार्ताहर ।**
माथेरानमधीलजटीलसमस्यांना सामोरे जाताना येथील एक-एक पिढी संपुष्टात येत आहे. परंतु, येथील अनेक प्रसंगांना तोंड देताना अक्षरशः नाकेनऊ येत असले तरी पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असणारा भूमिपुत्र प्रत्येक अडचणींचा सामना करण्यासाठी नेहमीच सज्ज असतो.

माथेरानमधील रस्त्यांची दुर्दशा व अत्यावश्यक सेवासुविधांचा अभाव प्रकर्षाने जाणवत आहे. तसेच, पर्यटन वाढीसाठी पर्यायी व्यवस्था निर्माण व्हावी, यासाठी पाठपुरावा करण्यास स्थानीक




नेतेमंडळींची असमर्थता दिसून येत आहे. वीज व पाणी प्रश्नांची उकल केली जात नाही की, घाटरस्त्यात सुट्ट्यांच्या हंगामात होणारी नित्याचीच वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी पुढाकार घेतला जात नाही. यामुळे पर्यटनावर विपरीत परिणाम होत आहे. यामुळे पिढ्यानपिढ्या माथेरानमध्ये वास्तव्यास असलेल्या भूमिपुत्रांना समस्या आणि अडचणींवर मात करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे.

याबाबत काडीचेही सोयरसुतक नसल्याप्रमाणे येथील नेतेमंडळी वावरताना दिसत आहेत. याचे मुख्य कारण नगरपरिषदेवर असलेले प्रशासक राज्य. यामुळे येथील नेतेमंडळी आजही मूग गिळून गप्प बसले असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

# नुकसानीची पूर्वसूचना विमा कंपनीला द्यावी

## ■ कृषी अधिकाऱ्यांचे शेतकऱ्यांना आवाहन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**
चालू खरीप हंगामामध्ये मुरुड तालुक्यामध्ये पीक विमा योजना चोलामंडल जनरल इन्शुरन्स कंपनी तर्फे राबविण्यात येत आहे. भात, नाचणी व उडीद ही पिके अधिसूचित असून योजनेमध्ये चालू खरीप हंगामामध्ये मुरुड तालुक्यातील १ हजार १७७ इतक्या शेतकऱ्यांनी पीक विमा काढला आहे. सध्या भातपीक काढणीला आलेले असून गेल्या आठवड्यापासून पावसाचे वातावरण तयार होत आहे. तसेच, अधून मधून पाऊस देखील पडत आहे. अशावेळी काढणी झालेल्या भातपीकाचे पावसामुळे नुकसान झाल्यास ज्या शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा विमा काढलेला आहे,



अशा शेतकऱ्यांनी वेळीच विमा कंपनीला पूर्वसूचना दिली तरच नुकसान भरपाई मिळेल.

काढणीपश्चातयाबाबीअंतर्गत अधिसूचित पिक कापणी करून सुकवण्यासाठी ठेवलेले असताना कापणीपासून जास्तीत जास्त दोन आठवड्यांत (१४ दिवस) गारपीट चक्रीवादळ यामुळे पडलेला पाऊस व अवकाळी पाऊस यापैकी जे कारण असेल ते नमूद करून काढणी पश्चात या बाबी अंतर्गत नुकसानीची माहिती देणे आवश्यक आहे. पिक नुकसानी बाबतची पूर्वसचना केंद्र शासनाने विकसित केलेल्या किंवा विमा कंपनीचा टोल फ्री क्रमांक, विमा कंपनीचे जिल्हा व तालुका स्तरावरील कार्यालय, विमा कंपनीचा ई-मेल, संबंधित बँक किंवा कृषी विभाग यांना देण्यात यावी.

रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी चोलामंडलम जनरल इन्शुरन्स कंपनी टोल फ्री क्रमांक १८००२०८९२०० या विमा कंपनीच्या टोल फ्री क्रमांक संपर्क करावा. अधिक माहितीसाठी कृषी विभागाशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## चाकूच्या धाकाने रोकड लंपास

**पनवेल** : डिलिव्हरी कुरिअर सेंटर या कंपनीच्या कार्यालयात घुसलेल्या एका आरोपीने कार्यालयातील कर्मचाऱ्याला चाकूचा धाक दाखवून कार्यालयात जमा झालेली रोख रक्कम लुटून पसार झाल्याची घटना घडली आहे. खारघर वसाहतीमधील सेक्टर-२० येथे असलेल्या कुरिअर सेंटर कंपनीच्या कार्यालयात नुर इस्माल नुर अली मलिक हा एकटा असताना एक अज्ञात व्यक्ती घुसली. त्याने नुर अली याला चाकूचा धाक दाखवून कार्यालयातील १ लाख ४७ हजार रु. तसेच त्याचा मोबाईल घेऊन तो पसार झाला. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# महाड खासगी रुग्णालयांना नोटीस

**। महाड । प्रतिनिधी ।**
दिवसेंदिवस वैद्यकीय क्षेत्रात प्रगती होत असली तरी या प्रगतीचा फायदा नक्की कोणाला होतोय, याबाबत प्रश्नचिन्ह आहे. यापूर्वी सहज होणाऱ्या प्रसुतीसाठी आता सिजर करण्याची गरज असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहे. आणि नातेवाईक देखील पैशांचा विचार न करता सिजरसाठी तयार होतात. यातच महाड शहरांमधील रुग्णालयांमध्ये गेल्या वर्षभरात ५० टक्के हुन अधिक सीजर झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

प्रसुतीकरता गरोदर महिलेला रुग्णालयात दाखल केल्यानंतर अवघ्या काही तासातच डॉक्टरांकडून सिजर करणे गरजेचे आहे, असे सांगितले जाते.




यासाठी अनेक कारणे देऊन रुग्णाच्या नातेवाईकांना घाबरवले जाते. रुग्णांचे नातेवाईक देखील पैशापेक्षा जीव प्यारा असा विचार करून तात्काळ तयार होतात. काही ठिकाणी ३० हजार तर काही ठिकाणी ६० हजारापेक्षा अधिक रक्कम उकळली जाते. याबाबत नुकत्याचझालेल्याएकातक्रारीनुसार महाड ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांनी चौकशी करून महाड शहरातील खासगी रुग्णालयांना कारणे दाखवा नोटीस बजावल्या आहेत.

> **महाडमध्ये झालेल्या एका तक्रारीनुसार माहिती घेण्यात आली असता येथील खासगी रुग्णालयांत जवळपास ५० टक्क्यांहून अधिक सिझरचे प्रमाण आहे. याबाबत या रुग्णालयांना कारणे दाखवा नोटीस बजावल्या आहेत. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे रुग्णालयांचा खुलासा पाठवला असून कारवाई केली जाईल.**
> **–डॉ. शंतनु डोईफोडे, अधीक्षक, महाड ग्रामीण रुग्णालय**

# परतीच्या पावसाची दमदार हजेरी



**। माथेरान । वार्ताहर ।**
माथेरान शहरात परतीच्या पावसाने दमदार हजेरी लावली आहे. यावेळी येथील नागरिकांची आणि पर्यटकांची चांगलीच तारांबळ उडाली होती. दरम्यान, माथेरान शहरावर धुक्याची चादर पसरलेली होती. विद्युत पुरवठा देखील खंडित झाल्याने सायंकाळी सर्वत्र अंधार पसरला होता. यातूनच काही पर्यटक व नागरिक वाट काढत होते.

हवामान खात्याने दिलेल्या अनुमानानुसार विजांच्या कडकडाटासह परतीचा पाऊस संपूर्ण राज्यभर बरसत असून मुंबई तसेच उपनगरात देखल परतीच्या पावसाने दाणादाण उडाली आहे. माथेरान शहराला सुद्धा मागील काही दिवसांपासून सायंकाळच्यावेळी परतीचा पाऊस शहराला झोडपून काढत आहे. ढगांच्या गडगडटासह व विजांच्या लखलखाटात सायंकाळी पावसाने दमदार हजेरी लावली.

दरम्यान, मोठ्या आवाजात वीजा चमकत होत्या. येथील परतीच्या पावसाने नागरिकांची तसेच या पर्यटनस्थळी असलेल्या पर्यटकांची त्रेधातिरपीट उडवली होती. संपूर्ण माथेरानमध्ये धुक्याची चादर पसरलेली होती. यामुळे माथेरान शहराचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला होता. रात्री उशिरापर्यंत विद्युत पुरवठा काही भागात सुरळीत झाला नव्हता. यामुळे नागरिकांना येथे थोड्या त्रासाला सामोरे जावे लागले. वीज पुरवठा सुरळीत नसल्याचा परिणाम येथील ई-रिक्षांवर देखील झाला होता.

## कर्ज देण्याच्या बहाण्याने फसवणूक

**। पनवेल । वार्ताहर ।**
पनवेलमधील एका व्यक्तीच्या व्हॉटसअपवर अँक्सीस बँक अधिकाऱ्याचे बनावट आयडी कार्ड पाठवून त्यांचा विश्वास संपादन केला. यावेळी या व्यक्तीचे नेट बॅकींग हॅक करून १४ लाखांचे वयक्तीक कर्ज करून पैसे त्यांच्या बँक खात्यात जमा झाले. यानंतर हे कर्ज निष्क्रिय करण्याच्या बहाण्याने पीडित व्यक्तीच्या खात्यात जमा झालेली १४ लाखांची रक्कम इतर खात्यात वळवुन त्यांची फसवणुक केल्याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पनवेलच्या सायबर सेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिपाली पाटील व पथकाने पीडित व्यक्तीचे बॅक व्यवहार विश्लेषण आणि क्लिष्ट तांत्रिक विश्लेषन केले असता गुन्ह्यातील संशयित आरोपीत टोळी ही दिल्ली येथुन फसवणूक करीत असल्याचे निष्पन्न झाले. या गुन्ह्यातील एका आरोपीला दिल्ली येथुन सापळा रचुन शिताफिने अटक करण्यात आली आहे.

## कळंबोलीतील उद्योजकाकडून शालेय साहित्य वाटप

# विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हसू

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला गती मिळावी यासाठी कळंबोली येथील उद्योजक धनंजय अवसारे यांनी सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम केले आहे. अलिबाग तालुक्यातील महाजने येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्याकडून शालेय साहित्य देण्यात आले आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले आहे. हा कार्यक्रम गावातील तुषार गुंड यांच्या सौजन्याने सोम वारी (दि.१४) येथील जि.प. शाळेमध्ये पार पडला.**



रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकणारे गावे, वाड्या वस्त्यांमधील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात आहेत. जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थी टिकला पाहिजे यासाठी शिक्षण विभागाकडून विविध उपक्रम राबविले जात आहेत. विद्यार्थी गळती रोखण्यासाठी शैक्षणि व अशैक्षिक उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांना घडविण्याचा प्रयत्न केला जातो. वेगवेगळे उद्योजक, व्यवसायिकदेखील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून मदतीचा हात देत असतात. याचाच एक भाग म्हणून उद्योजक धनंजय अवसारे हे नेहमीच शैक्षणिक व सामाजिक उपक्रमात सक्रिय राहिले आहेत. महाजने गावातील युवा नेतृत्व तुषार गुंड यांच्या पुढाकाराने धनंजय अवसारे यांच्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देण्यात आले आहे. तुषार गुंड, जितेंद्र गुंड, राकेश औचटकर, समीर पाटील तसेच शाळेच्या शिक्षिका सुशिला सांदणकर यांच्या हस्ते दप्तर, पेन आदी शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले आहे. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले होते.

यावेळी जितेंद्र गुंड, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष समीर पाटील, राकेश औचटकर, शाळेच्या शिक्षिका सुशिला सांदणकर व विद्यार्थी उपस्थित होते.

# निर्णायक लढाई सुरू

राज्यातील निवडणुकांची अखेर घोषणा झाली आहे. यावेळी सर्व २८८ जागांवर एकाच दिवशी मतदान घेण्याला आपण सक्षम आहोत असा साक्षात्कार निवडणूक आयोगाला झाला आहे. लोकसभेला पाच किंवा सात टप्प्यात मतदान घेणे ही नरेंद्र मोदींच्या भाजपची सोय होती याची ही स्पष्ट कबुली आहे. गेल्या काही दिवसात राज्य मंत्रिमंडळाने सर्वांसाठी सर्व काही असे म्हणून खजिना रिता केला आहे. त्याचा आपल्याला फायदा होईल अशी सत्तारुढांची गणिते दिसतात. मोदींचा करिश्मा संपलेला आहे. त्यामुळे प्रत्येक टप्प्यात त्यांच्या सभा घेण्याची गरज नाही असाही भाजपने निष्कर्ष काढलेला दिसतो. त्यामुळे शिंदे गटानेच एका दिवसात मतदान घेण्याची मागणी केली होती. ती मान्य झाली. विरोधकांची ताकद विखुरली जावी व त्यांना सर्व प्रांतात फिरण्यास फार अवसर मिळू नये असा यामागचा हेतू असू शकतो. प्रत्यक्षात या सर्व डावपेचांचा किती उपयोग होतो हे २३ नोव्हेंबरला कळेलच. सर्व देश पूर्णपणे आपल्या टाचेखाली असला पाहिजे ही मोदी-शाह यांची इच्छा आहे. महाराष्ट्र तिला आजतागायत बधला नाही. त्यामुळे फोडाफोडी करून येथील राजकारणाचा त्यांनी विचका करून ठेवला. तत्व, नीतीमत्ता या कशालाच अर्थ उरलेला नाही. हे राजकारण मराठी जनता मान्य करणार आहे काय हा या निवडणुकीतील मुद्दा आहे. लोकसभेच्या निवडणुकीत याची चर्चा झाली होती व जनतेने आपला कौल स्पष्टपणे मोदींच्या विरोधात दिला होता. पण दिल्लीइतकीच, किंबहुना त्याहूनही अधिक मुंबईची लढाई महत्वाची आहे. मोदी-शाह यांनी या राज्यातले उद्योग गुजरातमध्ये पळवून नेऊन इथल्या विकासावर घाला घातला आहेच. मुंबईचे महत्व कमी करण्याचे प्रयत्न चालू आहेतच. आता या राज्यातील प्रशासन व कारभार यांनाही खच्ची करण्याचा हा उद्योग आहे. या उद्योगकर्त्यांना जनतेने हाणून पाडायला हवे.

## निर्णयांचा भस्म्यारोग

महायुतीने गेला महिनाभरात सुमारे १ हजार ३४२ जीआर किंवा शासननिर्णय काढले. त्यातले १८९ निर्णय निवडणूक घोषणांच्या आदल्या दिवशी म्हणजे चौदा ऑक्टोबरला घेतले गेले आहेत. एरवी मंत्रिमंडळ बैठकीत सरासरी आठ-दहा निर्णय घेतले जातात. पण गेल्या तीन बैठकांमध्ये सरासरी २७ निर्णय घेतले गेले. निर्णयांचा हा भस्म्यारोग पाहता, समोर येईल त्या कागदावर मंत्री आणि सचिव बहुदा डोळे मिटून सह्या करीत होते. निव्वळ गेल्या तीन बैठकांमधील निर्णयांमुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर ७३ हजार कोटी रुपयांचा भार पडणार आहे. लाडकी बहीण योजनेमुळे जवळपास ७६ हजार कोटी रुपये द्यावे लागणार असल्याचे पूर्वी स्पष्ट झाले आहे. याखेरीज इतर निर्णयांमुळे आणखी पन्नास हजार ते एक लाख कोटी खर्ची पडतील. इतका सर्व पैसा सरकार कोठून आणणार आहे? यासाठी कर्जे उभारावी लागणार व अंतिमतः तो बोजा नागरिकांवरच पडणार. विविध जातींसाठी महामंडळांचा पाऊस पाडण्यात आला आहे. बारी, तेली, हिंदू खाटीक, लोणारी, लोहार, जैन, मच्छिमार, आगरी, शिंपी, गवळी, वाणी, नाथपंथीय, राजपूत, सुतार, आर्य वैश्य, विणकर अशा जातींचा यात समावेश आहे. जरांगेच्या मराठा आरक्षण आंदोलनाला शह देण्याचा व मराठ्यांच्या विरोधात ओबीसी जातींना आपल्या बाजूने करण्याचा हा युतीचा प्रयत्न आहे. मात्र तो राज्यकारभाराचे धिंडवडे काढणारा आहे. सरकारने एकत्रितपणे सर्व समाजाला फायदा होईल असा कारभार करणे अपेक्षित असते. असे हे प्रत्येक जाती वा समाजांच्या तोंडावर चार तुकडे फेकून विकास केल्याचा दावा करणे हे गुन्हेगारी स्वरुपाचे कृत्य आहे. सरकार म्हणून आपली जबाबदारी झटकणारे आणि समाजात अधिक भेद निर्माण करणारे आहे. धनगर समाजाला आदिवासींमध्ये समाविष्ट करण्याचे आश्वासन देऊन या दोन समाजात या सरकारने तेढ निर्माण केली आहेच. ओबीसी व मराठा यांच्याबाबतही त्याचे हेच चालू आहे. या अशा कारभाराला जनतेने थारा दिला तर महाराष्ट्राची पुरती वाट लागायला वेळ लागणार नाही.

## आघाडीकडून अपेक्षा

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला ३१ जागा मिळाल्या. मात्र विधानसभेला आपोआप त्याची पुनरावृत्ती होईल असे गृहित धरणे धोक्याचे आहे. लोकसभेला मोदींच्या हुकुमशाहीविरोधात खूप आधीपासून एक वातावरण तयार झाले होते. याच मुद्द्यावर प्रागतिक पक्षांनी आघाडीशी सहयोग केला. मात्र लोकसभेनंतर आघाडीच्या नेते पुन्हा आपापल्या पक्षापुरते पाहू लागले व गाफील झाले. प्रागतिक पक्ष तसेच विविध गटांच्या पाठिंब्याखेरीज महाराष्ट्रात पुन्हा लोकसभेसारखे यश मिळणे शक्य नाही हे त्यांना कळणे आवश्यक आहे. आघाडीचे अंतिम जागावाटप होताना या सर्वांना नीट न्याय दिला जाईल अशी अपेक्षा आहे. अशा एकत्रित प्रयत्नांना नक्की यश येईल असे सध्याचे वातावरण आहे. लोकसभा निवडणुकांमध्ये मोदींचे नाणे खोटे निघाले. त्यांनी १९ प्रचारसभा घेतल्या होत्या. पण तेथील सर्व उमेदवार पडले. मोदींच्या नावावर मते मिळणे सोडाच, कदाचित त्यांच्या नावाचा उलटाच परिणाम होईल अशी स्थिती उद्भवली. ही स्थिती खुद्द मोदींनीही मान्य केली असावी. गेल्या आठवड्यात महाराष्ट्रात आले असता त्यांनी एकनाथ शिंदे सरकारचे व लाडकी बहीण योजनेचे वारेमाप कौतुक केले. वास्तविक लाडकी बहीण योजना ही मध्य प्रदेशातल्या लाडली बहेना ची नक्कल आहे. पण तिथल्या निवडणूक प्रचारात मोदी या योजनेचे किंवा चौहान यांचे फारसे नाव घेत नसत. उलट चौहान यांचा फोटो छोटा करणे, केंद्रीय मंत्र्यांनी आपल्या स्वतंत्र प्रचारयात्रा काढणे असे उद्योग तेथे केले होते. कारण, मोदींच्या नावावर मते मिळतील अशी गुर्मी होती. महाराष्ट्रात तसा माज करता येत नाही याची जाणीव भाजपवाल्यांना झालेली दिसते. अर्थात शिंदे सरकारच्या या योजनांना जनता किती भुलते हे मतमोजणीत कळेलच. मोदी की गॅरंटी नावाने लोकसभेपूर्वी जी दिवसरात्र जाहिरातबाजी चालू होती तिला मराठी जनतेने छटाकभरसुध्दा किंमत दिली नव्हती. विधानसभेची लढाई अधिक निर्णायक आहे. जनता योग्य तो फैसला करील यात शंका नाही.

विचार

# लोकशाहीच्या पारदर्शकतेसाठी...

सुधीर दाणी

भारताचे निवडणूक आयुक्त श्रीमान टी. एन. शेषन यांनी निवडणूक आयोगाला प्राप्त स्वायत्तता दर्जा व त्याच्या माध्यमातून प्राप्त अधिकाराचा वापर करून निवडणूक प्रक्रियेत सुधारणा केल्याने बऱ्यापैकी निवडणूक प्रक्रियेत सुधारणा झालेल्या आहेत आणि त्याचे सकारात्मक परिणाम दृश्य स्वरूपात संपूर्ण भारतीयांना दिसत आहेत. खेदाची गोष्ट ही आहे की, त्यांच्या पश्चात कालसुसंगत सुधारणांमध्ये खंड पडल्याने स्वातंत्र्याच्या ७८ वर्षानंतर देखील 'घटनेला, संविधानाला अभिप्रेत लोकशाहीची स्वप्नपुर्ती' दृष्टिक्षेपात आलेली नाही.

निवडणूक आयोगाला नागरिकांचा प्रश्न आहे की, केवळ निवडणुकीतील मतदान हाच बळकट लोकशाहीचा एकमेव निकष आहे का? ग्रामपंचायत सदस्यापासून ते आमदार-खासदार पदासाठी 'पात्र' व्यक्तीची निवड करणे हे बाब देखील लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. मतदारांना सुयोग्य-पात्र व्यक्तीची निवड त्या त्या पदासाठी करण्यासाठी त्या त्या व्यक्तीचा शैक्षणिक-राजकीय-आर्थिक-सामाजिक पूर्वइतिहास मतदारांना कळणे आवश्यक असतो.

परंतु प्रत्यक्षात वस्तुस्थिती अशी आहे की जी व्यक्ती गेली ५ वर्षे आमदार-खासदार म्हणून कार्यरत होती त्या व्यक्तीने खर्च केलेल्या 'आमदार/खासदार' निधीचा लेखाजोखा देखील मतदारांसाठी उपलब्ध नसतो. हि कुठली लोकशाही व्यवस्था? स्वातंत्र्य प्राप्तीसाठी लढा देणाऱ्यांना 'अशी लोकशाही' अभिप्रेत होती का? गल्ली पासून दिल्ली पर्यंत 'पारदर्शक कारभाराच्या दवंड्या' पिटल्या जात असताना मतदारांना लोकशाही यंत्रणांच्या कारभारापासून वंचित का ठेवले जाते? का ग्रामपंचायती पासून ते राज्य-केंद्र सरकारच्या प्रत्येक यंत्रणांच्या प्रत्येक निर्णयाची, पै ना पै खर्चाचा लेखाजोखा पब्लिक डोमेनवर खुला केला जात नाही? गुप्त कारभार पद्धती हीच भ्रष्टाचाराची जननी आहे हे सर्वज्ञात असताना सर्वच यंत्रणांचा कारभार गुप्त ठेऊन लोकशाहीची का प्रतारणा केली जाते आहे? गेली अनेक दशके हा प्रश्न अनुत्तरित आहे की, जो निवडणूक आयोग लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी निवडणुकीत मतदान करा असे मतदारांना आवाहन करते तोच राज्य व निवडणूक आयोग लोकशाहीतील यंत्रणांचा कारभार पारदर्शक करून लोकशाही खऱ्या अर्थाने बळकट करण्यासाठी पाऊले का उचलत नाही?

**दृष्टिक्षेपातील संभाव्य उपाय :**

१) निवडणूक आयोगाने प्रत्येक ग्रामपंचायती पासून ते लोकसभेच्या निवडणुकीसाठी उभ्या राहणाऱ्या सर्व उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, गुन्हेगारी इतिहास, आर्थिक परिस्थिती, अनधिकृत बांधकाम, आर्थिक फसवणुकीचा इतिहास (कर्ज बुडवणे वगैरे) याची माहिति निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करून त्याची लिंक त्या त्या मतदार संघातील मतदारांना व्हाट्सअँप, फेसबुक व तत्सम सोशल मीडियाच्या माध्यमातून निवडणुकीपूर्वी किमान ३ वेळा पाठवावी.

२) अगदी केजीच्या विद्यार्थ्यांची देखील वर्षभरानंतर त्याने वर्षभरात केलेल्या अभ्यासाचे परीक्षण केले जाते, त्याचे उत्तरदायित्व फिक्स असते परंतू लोकशाहीचा गाडा हाकणाऱ्या लोकप्रतिनिधींचे उत्तरदायित्व फिक्स करणारी, परीक्षण करणारी कोणतीच पद्धत, यंत्रणा भारतीय लोकशाहीत अस्तित्वात नाही. लोकप्रतिनिधींना उत्तरदायी बनवण्यासाठी विद्यमान आमदार -खासदारांना पुन्हा निवडणुकीला उभे राहताना त्यांनी ५ वर्षात केलेल्या कामाचे मूल्यांकन करणारे प्रगतीपुस्तक पब्लिक डोमेनवर उपलब्ध करून देणे अनिवार्य करावे.

३) लोकप्रतिनिधींना जनतेप्रती उत्तरदायी करण्यासाठी नगरसेवक निधी, आमदार निधी, खासदार निधी याचा लेखाजोखा, कामाचे स्वरूप, कंत्रादाराचे नाव, केलेल्या खर्चाचा तपशील ई. निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याची पद्धत सुरु केली जावी. ४) भारतीय लोकशाही व्यवस्थेत निवडणुका लढवण्यासाठी शैक्षणिक अट, अनुभवाची अट नसल्याने निवडून आलेल्या व्यक्तीने त्या त्या पदाला योग्य न्याय द्यावा यासाठी ग्रामपंचायत सदस्य ते खासदार या प्रत्येक पदासाठी ७ दिवस ते ३ महिन्यांचे प्रशिक्षण पद्धत कार्यान्वित करून सदरील परीक्षण अनिवार्य करावे व ते पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थींची परीक्षा घेऊन पडताळणी करावी. ५) निवडणूकपूर्व जाहीरनामा, वचननामा, आश्वासने यांच्या पूर्ततेच्या अंमलबजावणीची प्रक्रिया ब्लूप्रिंट सक्तीची करा : लोकशाही पद्धतीत निवडणुकीत प्रचार हा जनमताला दिशा देण्याचा सर्वोत्तम मार्ग असतो. परंतू गेल्या काही दशकांत प्रचारातील जाहीरनामे, वचननामे हि दिशाभूल करणारे मार्ग ठरताना दिसतात. याचे प्रमुख कारण म्हणजे निवडणूक पूर्व काळात दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याच्या सक्ती बाबत वर्तमान व्यवस्थेत कोणतीच व्यवस्था नाही. पर्यायाने 'तुझ्यासाठी मी चंद्र तारे आणून देईल' अशा प्रकारचे वचन आपल्या प्रियसीला देतो त्याप्रमाणे प्रत्यक्षात कधीच पूर्तता केले जाऊ शकत नाहीत अशा प्रकारचे आश्वासने राजकीय पक्षांकरवी दिले जाताना दिसतात. हि एक प्रकारे लोकशाहीची थट्टाच ठरते, दिशाभूल ठरते. हे थांबायला हवे!

निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्ष व त्यांच्या नेत्यांना जी आश्वासने दिली जात आहेत त्याच्या पूर्तता प्रक्रियेची ब्ल्यू प्रिंट जनतेसमोर मांडणे सक्तीचे करावे. उदा. आम्ही आरक्षण देऊ अशा प्रकारचे आश्वासन देणाऱ्या पक्षाला त्याची अंमलबजावणीच्या बाबतीतील कायदेशीर वैधता, अंमलबजावणीची प्रक्रिया याबाबतची परिपूर्ण माहिती जनतेसमोर मांडण्याची सक्ती असावी.

६) मतदारांसाठी 'डिजिटल जनजागृती' अभियान राबवावे : भारतीय लोकशाहीचे कटू वास्तव हे आहे की आपल्या देशातील अगदी उच्चशिक्षित मतदारांना देखील आपण निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींचे नेमके कर्तव्य काय असते याची माहिती नसते त्यामुळे लोकप्रतिनिधींचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन केले जात नाही आणि पर्यायाने अनेक अपात्र व्यक्ती केवळ वाढदिवसाला हजेरी, दहाव्याला हजेरी, लग्न -वाढदिवसाला हजेरी अशा भावनात्मक गोष्टींचे भांडवल करून निवडून येताना दिसतात. त्यांनी त्यांच्या ५/१० वर्षांच्या काळात एक देखील जनहिताचा प्रश्न विधानसभेत, लोकसभेत विचारलेला नसतो ना त्यांनी कधी कोणत्या त्यांनी विविध विषयांवरील विधिमंडळ समितीत काम केलेले असते. सरकारी आरोग्य व्यवस्था सक्षम करण्याचे प्राथमिक कर्तव्याला तिलांजली देत मोफत आरोग्य शिबिरे भरवणे, डोळ्यांची तपासणी-चष्मे वाटप असे कार्यक्रम घडवून आणून स्वतःचे नाव मिरवले जाते. यात लोकप्रतिनिधी यशस्वी ठरतात याचे कारण म्हणजे लोकशाही साठी आवश्यक पात्रता नसणारे मतदार-नागरिक.

सजग, जागृत नागरिक हाच खऱ्या अर्थाने लोकशाहीचा प्रमुख स्तंभ असतो हि बाब लक्षात घेत 'स्वायत्त निवडणूक आयोगाने' लोकशाहीच्या उच्चीकरणासाठी, बळकटीकरणासाठी डिजिटल जनजागृती अभियान राबवावे. विविध सोशल मीडियाच्या माध्यमातून देशातील लोकशाही बाबत तज्ज्ञ असणाऱ्या व्यक्तींचे भाषण, प्रबोधन करणारे व्हिडीओ, कार्टून्स, शालेय अभ्यासक्रमात लोकशाही यंत्रणांची माहिती नागरीकाकांपर्यंत पोचवावी. लोकशाहीच्या दृष्टीने साक्षर नागरिक या साठी प्रयत्न करावेत.

७) लोकप्रतिनिधींना ५ वर्षांसाठी आचार संहिता असावी : निवडणूक जाहीर झाली की प्रत्येक भारतीयाच्या तोंडी, प्रसारमाध्यमात गाजणारा शब्द म्हणजे 'आचार संहिता'. अर्थातच ती अतिशय महत्वपूर्ण बाब आहे. परंतू निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधींना कोणतीच आचार संहिता नसल्याने लोकशाहीचे अधःपतन होते आहे. पुरोगामी महाराष्ट्राच्या विधानसभा कामकाजाचे मागील ५ वर्षाचा कार्यकाळ यासाठीचे उत्तम उदाहरण ठरते. प्रत्येक वर्षात किमान १०० दिवसाचे काम काज होणे अभिप्रेत असताना मागील ५ वर्षात केवळ १३१ दिवसांचे कामकाज झाल्याचे समजते. अलीकडच्या काळात एकमेकांची अडवणूक करण्यासाठी कामकाज रोखणे हा अविभाज्य भाग झालेला आहे . लोकशाहीचे एकुणातच होणारे अधःपतन रोखण्यासाठी निवडणूक आयोगाने केवळ 'मतदारांना मतदान करा, लोकशाही बळकट करा' असा सिमीत दृष्टिकोन न ठेवता प्रत्येक स्तरावरील लोकप्रतिनिधींसाठी आचारसंहिता योजावी. लोकशाहीचे इतके टोकाचे अधःपतन झालेले आहे की निवडून आल्यानंतर चक्क जनसंपर्क कार्यालये बंद केले जातात आणि निवडणुका आल्या की त्यांचे पुन्हा उद्घाटन केले जाते.

८) लोकप्रतिनिधींसाठी शैक्षणिक अर्हता फिक्स करा :

आपल्या देशात ट्रक ड्रायव्हर म्हणून लायसन्स मिळवण्यासाठी देखील शैक्षणिक अर्हता फिक्स केलेली आहे पण अगदी मुख्यमंत्री, पंतप्रधान पदासाठी देखील कोणतीच शैक्षणिक अर्हता ठरवलेली नाही. अमुक-तमुक शिक्षण नसणाऱ्या व्यक्तीने अमुक तमुक पद भूषवले, चांगला कारभार केला असे दाखले दिले जातात. पण अपवाद नियम असू शकत नाही हे ध्यानात घेतले जात नाही.काळ बदलला आहे, आर्टिफिशिअल इंटीलिजन्स सारखे तंत्रज्ञान आकाश व्यापू लागलेले आहे, प्रशासनात तंत्रज्ञानाचा वापर वाढतो आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षित, तंत्रज्ञानाची ओळख असणारे लोकप्रतिनिधी हि काळाची गरज ठरते. स्वातंत्र्याच्या सुरुवातीला एक वेळ क्षम्य ठरते परंतू एवढे दशके लोटल्यानंतर , सर्वशिक्षा सारखे अभियानावर काही करोड रुपयांचा निधी खर्च केल्यानंतर देखील लोकप्रतिनिधींसाठी शिक्षणाची अट घालण्याची वेळ येत नसेल तर आपल्या लोकशाहीची 'दिशा' चुकते आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

९) लोकप्रतिनिधींसाठी पात्र/अपात्र पद्धत सुरु करा :

असे म्हटले जाते की सरपंच हा त्या गावाचा शिल्पकार असतो, इंजिनियर असतो; त्याच प्रमाणे आमदार-खासदार हे त्या त्या भागाच्या विकासाचे शिल्पकार-विकासाचे इंजिन असतात. लोकप्रतिनिधींना लोकशाही व्यवस्थेत प्राप्त अधिकार लक्षात घेता हे १०० टक्के सत्य आहे . पण प्रश्न हा आहे की किती लोकप्रतिनिधी हि भूमिका पार पाडतात. याचे ढोबळमानाने उत्तर आहे ९० टक्के आपल्या पदाला न्याय देत नाहीत असेच आहे. यासाठी लोकशाही व्यवस्थेत लोकप्रतिनिधींसाठी पात्र/अपात्र पद्धत सुरु करणे अत्यंत निकडीचे आहेत. निवडणूक आयोगाने त्या त्या पदाचे नागरिकांच्या मार्फत त्या त्या लोकप्रतिनिधींच्या कामानुसार मूल्यांकन करण्यासाठी व्यवस्था उभारावी. केवळ निवडणुकीपुरता मतदारांचा अधिकार सिमीत न ठेवता प्रत्येक मतदाराला आपल्या लोकप्रतिनिधींचे विहित केलेल्या निकषांस अनुसरून मूल्यांकन करण्याची यंत्रणा सुरु करावी. वर्तमानातील डिजिटल तंत्रज्ञानाच्या मदतीने हि सहज शक्य गोष्ट आहे. मतदारांनी केलेल्या निकषांनुसारच पुढील निवडणुकीसाठी पात्र /अपात्रता ठरवली जायला हवी . हि अगदी आदर्श मागणी वाटेल पण त्या शिवाय देशाला चांगले, कर्तव्यक्षम लोकप्रतिनिधी मिळणार नाहीत हि गोष्ट लक्षात घ्यायला हवी. १०) अभ्यास गटाची स्थापना करा : लोकशाही व्यवस्था लोकाभिमुख, पारदर्शक, भ्रष्टाचारास धारा न देणारी, लोकप्रतिनिधींचे, प्रशासनाचे उत्तरदायित्व फिक्स करणारी होण्यासाठी आवश्यक उपाययोजना ठरवण्यासाठी व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी अभ्यास गटाची स्थापना करावी. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनातील झारीचे शुक्राचार्य लोकशाही यंत्रणा कधीच भ्रष्टचार मुक्त होऊ देणार नाहीत कारण 'घोडा घास से दोस्ती करेगा, तो खायेगा क्या?' अशी त्यांची अवस्था आहे.

आजकाल

# पाकिस्तानातील बैठकीच्या निमित्ताने

संजीव चांदोरकर

आज पाकिस्तानमधील इस्लामाबाद मध्ये शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन (एससीओ) च्या राष्ट्राध्यक्षांची बैठक सुरू होत आहे.

भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर हे या बैठकीत भारताचे प्रतिनिधित्व करत आहेत.

भारतीय परराष्ट्र मंत्र्यांची ही भेट अर्थातच पाकिस्तान देशाला दिलेली औपचारिक भेट नाही. तर एस सी ओ बैठकीचे यजमानपद यावेळी पाकिस्तान कडे असल्यामुळे ते पाकिस्तानला जात आहेत. एवढेच.

हा निर्णय घेण्याआधी भारताने बराच खल केलेला दिसतो. भारताला पाकिस्तान सारख्या शत्रुराष्ट्रात भारताच्या परराष्ट्र मंत्र्यांनी जाणे हे साधीसुधी घटना नाही. याआधी भारताचे परराष्ट्र मंत्री दहा वर्षांपूर्वी पाकिस्तानमध्ये गेले होते.

एस सी ओ हा चायना आणि रशियाच्या पुढाकाराने स्थापन झालेला युरेशिया मधील राष्ट्रांचा गट आहे. या गटाची आर्थिक आणि राजनैतिक ताकद वाढत असल्यामुळे भारत त्यापासून दूर राहू शकत नाही.

फक्त राजनैतिक निकष असता तर भारताचे परराष्ट्रमंत्री पाकिस्तानात जाते ना. पण एस सी ओ एक आर्थिक ताकद म्हणून पुढे येत आहे, म्हणून ते जात आहेत हे नक्की.

अमेरिकेने भारताला कितीही आपल्या गोटात खेचले तरी चीन आणि रशिया भौगोलिक दृष्ट्या भारताच्या, अमेरीका आणि युरोप पेक्षा जवळचे देश राहणार आहेत.

गेल्या काही दशकांच्या जागतिक पातळीवर



घडलेल्या आर्थिक, व्यापारी, तंत्र वैज्ञानिक, वित्तीय एकजिनसीकरणाच्या प्रक्रियेमुळे मागच्या शतकातील राजनैतिक, लष्करी संदर्भ पार उलटे सुलटे झाले आहेत.

मागच्या शतकातील हे विचारव्यूह प्रायः द्विअक्षी/बायनरी, अतिसुद्धतावादी होते. आहेत. आपला-तुपला, शत्रू - मित्र, आपल्या विचारसरणीचा-विरुद्ध विचारसरणीचा अशा काळ्या पांढऱ्यात सारे विभागले होते. त्या साऱ्या विचारव्यूहांचीं धूळधाण उडत आहे

भारत आणि चीन स्वतःला कधीही मित्र म्हणत नाहीत. काही वर्षांपूर्वी डॉकलाम सीमेवर झालेल्या रक्तरंजित संघर्षानंतर तर संबंध ताणलेले होते. अजूनही आहेत. पण याच काळात चीन भारताचा सर्वत मोठा व्यापारी भागीदार झाला आहे. हा म्हटले तर केवढा मोठा विरोधाभास आहे.

चार पैकी तीन भारतीय चिनी कंपन्यांचे मोबाईल हँडसेट आज देखील वापरतात. आणि घराघरातील चिनी ब्रॅण्डची तर मोठी यादी आहे. चिनी कंपन्यांच्या भारतात गुंतवणुकी आहेत. आपल्या देशाचे मुख्य आर्थिक सल्लागार शिफारस करत आहेत कि चिनी एफडीआयना अजून प्रोत्साहन दिले पाहिजे.

दहा -पंधरा वर्षांपूर्वी हा विचार करणाऱ्याला/शत्रूराष्ट्राच्या वस्तू वापरणाऱ्याला देशद्रोही म्हटले गेले असते.

हा विरोधाभास फक्त भारत -चीन पुरता मर्यादित नाही.

युक्रेनवर हल्ला केल्यांनतर अमेरिकेने रशियाची आर्थिक नाकेबंदी केली आणि नाटो मधील सभासदांना रशियावर बहिष्कार घालायला सांगितले. तो धुडकावून युरोपातील नाटो राष्ट्रांनी रशियाकडून तेल/वायू ची खरेदी करणे सुरूच ठेवले होते

हे फक्त आंतरराष्ट्रीय पातळीवर घडत नाहीये. देशात देखील अमुक मालावर बहिष्कार, तमक्यांच्या दुकानातून माल घेऊ नका असले फतवे निघतात, बातम्या छापून येण्यापुरते. नंतर सगळे हवेत विरून जाते.

भारत आणि पाकिस्तान मध्ये क्रिकेट मॅच भारतात खेळू द्यायची नाही म्हणून नेहमी शड्डू ठोकले जातात. पण भारत पाकिस्तान मधील क्रिकेट मॅचची टीआरपी आणि त्यातून मिळणारे जाहिरातीचे उत्पन्न एवढे मोठे आहे कि संघटक ती मॅच दुबई सारख्या देशात खेळवतील, जगभर त्याचे प्रसारण करतील आणि विरोध करणाऱ्यांसकट सगळे आपापल्या घरात बसून टीव्हीसमोर चिकटून ती मॅच बघतील

सर्वच शुद्धतावाद्यांची ऐशीतैशी होत आहे

हे सारे जे घडत आहे ते ठोस आहे, त्याची फूटप्रिंट मोठी आहे आणि हे थांबणारे नाही.

आंतरराष्ट्रीय राजनैतिक संबंध आणि अंतरराष्ट्रीय आर्थिक हितसंबंध यांची रस्सीखेच सुरु आहे.

या सगळ्याचे अन्वयार्थ लावण्याची गरज आहे.

लोकसंसद

## चटका लावून जाणारी निवृत्ती

मराठी नाट्य आणि सिने सृष्टीतील हरहुन्नरी कलाकार अतुल परचुरे यांचे निधन रसिकांसाठी चटका लावून जाणारे ठरले. अतुल परचुरे हे गेल्या काही दिवसांपासून कर्करोगाने आजारी होते मात्र ते असे अकाली जातील असे कोणालाच वाटले नाही. बाल कलाकार म्हणून अभिनय कारकिर्दीला सुरुवात करणाऱ्या अतुल परचुरे यांनी आपल्या विविधांगी भूमिकांनी रसिकांच्या मनात वेगळे स्थान मिळवले. अतुल परचुरे यांनी नाटकात विविध भूमिका साकारल्या असल्या तरी त्यांच्या विनोदी भूमिका प्रेक्षकांच्या मनात घर करून गेल्या. अतुल परचुरे यांनी आपल्या विनोदी अभिनयाने रसिकांच्या चेहऱ्यावर आनंदाचं हसू उमटवलं. अतुल परचुरे यांनी पु. ल देशपांडे यांच्या समोर त्यांचीच व्यक्तिरेखा व्यक्ती आणि वल्ली नाटकात अत्यंत उत्तम पद्धतीने साकारली. गेला माधव कुणीकडे, तुझे आहे तुझ्यापाशी, भ्रमाचा भोपळा, बे दुणे पाच, वासुची सासू, प्रियतमा या नाटकातील त्यांच्या भूमिका भाव खाऊन गेल्या. नाटकासोबतच त्यांनी चित्रपट आणि दूरचित्रवाहिनीवरील मालिकात केलेल्या भूमिकाही प्रेक्षकांना भावल्या. कर्करोगासारख्या गंभीर आजाराशी लढा देत त्यांनी आपल्या अभिनयाचा प्रवास सुरूच ठेवून लाखो रसिकांची मने जिंकली. अतुल परचुरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**- श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१६ ऑक्टोबर**

**१८८६ :-** विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील स्त्री समस्या व कौटुंबिक समस्या स्त्रीच्या दृष्टिकोनातून मांडणाऱ्या लेखिकांच्या पहिल्या फळीतील एक, गिरिजाबाई महादेव केळकर यांचा जन्म. 'पुरी हौस मिटली', 'पुस्तकी शीक आणि व्यवहाराची भीक' या कादंबऱ्या, 'अंगठीचा प्रवास' ही दीर्घकथा, 'पुरुषांचे बंड आणि समाजचित्रे' हे कथासंग्रह तसेच 'द्रौपदीची थाळी' हे आत्मचरित्र त्यांनी लिहिले. काही नाटकेही त्यांनी लिहिली होती व अ. भा. मराठी नाट्यसंमेलनाचे (१९२८-मुंबई) अध्यक्षपद भूषविले होते. **१८८८:-** महाराष्ट्रातील एक नामवंत कवी, लेखक गोविंद रामचंद्र हिंगणेकर यांचा जन्म. 'दख्खनचा वीर' आणि 'पावनखिंड' या खंडकाव्यासह 'काव्यकुंज' हा काव्यसंग्रह प्रसिध्द. 'हिमालया सावधा' ही त्यांची कविता त्या काळात इंग्लंडच्या 'पोएट्री' मासिकात प्रसिध्द. 'वसंत मोहन' ही कुस्तीवर आधारित कादंबरी त्यांनी लिहिली. याशिवाय त्यांनी काही जपानी कविता मराठीत अनुवादीत केल्या. तसेच यहूदी आणि रशियन साहित्याचाही त्यांनी अभ्यास केला होता. **१९०५:-** कवी बाळकुंद्रीकर श्रीपंत माधव महाराज मूळ नाव दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी यांचे निधन. त्यांचे सर्व लिखाण 'श्री दत्तप्रेमलहरी पुष्पमाला' या अष्टात्मक खंडातून पदे, अभंग, आरत्या, अष्टक, धावे ही स्पूटरचना, उपदेशपर प्रवचने, परमानुभव प्रकाश, आत्म ज्योती, अनुभववल्ली गीतासार आदी ग्रंथ वा पत्रे यांचा समावेश. **१९०७:-** महात्मा गांधींवर पोवाडा आणि अनेक निसर्गकविता लिहिणारे कवी सोपानदेव चौधरी यांचा जन्म. 'काव्यकेतकी', 'अनुपमा' या संग्रहानंतर त्यांच्या समग्र कवितांचे 'सोपानदेवी' हे संकलन प्रकाशित झाले. कवयित्री बहिणाबाई चौधरी या त्यांच्या आई. 'आमच्या आईच्या कविता - बहिणाबाईची गाणी' हा संग्रह साकारण्यामागे सोपानदेवांचे प्रयत्न होते. **१९१५ :-** साहित्यिक भानू षिरधनकर यांचा जन्म. 'उधाणवारा', 'कारवारचा काळूराम','तराईच्या' ही पशुपक्ष्यांविषयी तर 'बलवंताचे आदर्श', 'ऑलिपिंकची नवलकथा' ही क्रीडाविषयक तर 'चोरटं सोनं' हे आणखी एक उल्लेखनीय पुस्तक त्यांच्या नावावर आहे. **१९१६:-** लेखिका शंकुतला दिवानजी यांचा जन्म. ह्यांचे आकाषवाणीवरुन कथा, नाटिका, ललित आदी स्वरुपाचे लेखन प्रसारीत झाले आहे. ह्यांचा 'मी प्रतिभाची आई लिहिते' हा आत्म कथनाचा विषय, मुलीच्या नृत्यकलेकडे जास्त लक्ष दिल्याने प्रतीकडे दुर्लक्ष, त्यात तिचा करुण अंत असा आहे. तसेच बालकथा, उदयोस्तु अंबे' आणि 'संस्ति रंग दर्शन' हे शालेय कार्यक्रमांना उपयोगी पडणारे पुस्तक, अशी साहित्य संपदा. **१९१९:-** ज्योतिष समाचारचे संपादक श्रीष्ण अनंत जकातदार यांचा जन्म. ज्योतिषशास्त्रावर त्यांनी अनेक पदव्या मिळवल्या होत्या. त्यांचे 'ज्योर्तिवैभव', 'उद्योगदर्शन', 'भाग्यरेखा', 'संख्याशास्त्र','दैवज्ञान परिचय' आदी ग्रंथ प्रकाशित. **१९२१:-** एक मर्मज्ञ कवी, साहित्यविवेचक वासुदेव बळवंत पटवर्धन यांचे निधन. आगरकरांच्या मृत्यूनंतर सुधारक काही वर्षे चालवले. वसंत या टोपणनावाने काव्यलेखन, 'राजनीतीची मुलतवे', 'शिक्षण, शिक्षक व अभ्यासक्रम', 'वाग्विवाह भाग १' आदी ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. **१९२४ :-** इस्लाम, इतिहास, अर्थषास्त्र कामगार आदी विषयांचे अभ्यासक, लेखक, स्वातंत्र्यसेनानी वसंत विनायक नगरकर यांचा जन्म. 'भारतीय स्वातंत्र्य संग्राम' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ त्यांच्या नावावर आढळतो. **१९२५:-** लेखक, अर्थषास्त्राचे जाणकार, नाट्यदिग्दर्शक, संसदेत पार्लमेंट सेक्रेटरी डॉ. मधुकर शंकर जावडेकर यांचा जन्म. ह्यांचा 'अर्थशास्त्र काय आहे नि काय नाही!', 'घरगुती उद्योगधंद्याचे अर्थशास्त्र' या ग्रंथासह 'चंक्रमण' हे प्रवासवर्णन, तसेच ह्यांच्या 'अपराजीत' या कादंबरीवर चित्रपटही निघाला. याशिवाय 'घडाघडाचे रुप आगळे','घर राहिले दूर','मन विदीर्ण विदीर्ण', 'महापुरुष', 'राधा', 'रिंगण' या कादंबऱ्या तर 'एअरपोर्ट' ,'स्ट्राँग मेडिसिन' या अनुवादित कादंबऱ्यांसह 'शतपावली' हा निबंध, अशी साहित्य संपदा. **१९३१:-** ख्यातनाम प्रकाषक आणि मराठी साहित्याचे जाणकार सर्जेराव घोरे यांचा जन्म. **१९३९:-** मीमांसाशास्त्राचे अभ्यासक, संस्कृत पंडीत वामनषास्त्री किंजवडेकर यांचे वयाच्या ५० व्या वर्षी निधन.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१६ ऑक्टोबर**

१) श्री. वामन दामोदर पाटील
१६-१०-१९३७ अलिबाग
२) श्री.वसंत परशुराम वर्तक
१६-१०-१९५२ विद्यानगर अलिबाग
३) श्री.(ॲड)कृष्णा दाजीबा पाटील
ब्राम्हणआळी, अलिबाग, १६-१०-१९५६
४) श्री.यशवंत लक्ष्मण राणे
मु.आवास, ता.अलिबाग १६-१०-१९४८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**श्री. आदिनाथ श्यामसुंदर पाटील,**
**मानकुळे, अलिबाग**

**सौ. अनुजा वर्तक,**
**वाढदिवस अलिबाग**

# महावितरण अधिकाऱ्यांना पत्रकारांचा घेराव

**। पाली । वार्ताहर ।**

**सुधागड तालुक्यात महावितरणाच्या भोंगळ कारभारामुळे तालुक्यातील जनता अतिशय त्रस्त झाली आहे. थोडासा पाऊस पडला तरी रात्रभर लाईट जाते. या भोंगळ कारभारा विरोधात पत्रकारांनी आज महावितरणच्या अधिकाऱ्याला घेराव घालत जाब विचारला.**



नागरिकांचे प्रश्न घेऊन तालुक्यातील सर्व पत्रकारांनी महावितरण कार्यालयावर धडक दिली. यावेळी संतप्त पत्रकारांनी अनेक प्रश्नांचीफैरी झाडल्या असाच प्रकार चालू राहिला तर पत्रकारांच्यावतीने जन आंदोलन छेडले जाईल असा इशारा दिला. तालुक्यातील नेतेमंडळी बिनकामाचे असून कुठल्याही प्रकारचे काम जनतेसाठी त्यांच्याकडून होताना दिसत नाही. म्हणूनच महावितरणाचे फावले आहे काय, असा प्रश्न देखील पत्रकारांनी तिथे उपस्थित असलेले उपअभियंता छात्रे यांना केला. प्रत्येक गावावाड्यांमध्ये एक महावितरणाचा लाईनमन हा राहिला पाहिजे. याकरता त्यांना घर भाडे भत्ता दिला जातो. तरी देखील कुठलाही वायरमेन हा गावात राहत नाही. त्या कारणाने एखाद्या गावात लाईट गेली तर रात्र रात्रभर अंधारात राहावं लागतं एन दसऱ्याच्या वेळेला सुधागड तालुक्यातील लोक अंधारात होते. त्यांना दसरा हा सण अंधारात साजरा करावा लागला. याला सर्वस्वी जबाबदार महावितरण असल्याचं सांगितलं. अनेक गावांमध्ये विजेचे पोल वाकले आहेत, काही ठिकाणी गंजलेले आहेत. त्याकडे देखील महावितरण लक्ष देत नसल्याबाबत खंत व्यक्त करण्यात आली. एखाद्या फार्म हाऊसमध्ये जर लाईट गेली तर तेथे लाईनमन अर्ध्या तासाच्या आत पोहोचतो आणि लाईट कुरु होते. मात्र, सामान्य माणसांना तात्कळत बसावे लागते. याकडे पत्रकारांनी लक्ष वेधले. यावेळी पत्रकार अमित गायकवाड, दत्तात्रय दळवी, निशांत पवार, गवस पठाण, परेश शिंदे, मंगेश यादव, विनोद भोईर, प्रशांत हिंगणे, ऑल इंडिया पँथर सेनेचे नरेश गायकवाड, सुधागड तालुका बौद्धजन पंचायतीचे अध्यक्ष भगवान शिंदे यांच्यासह अन्य उपस्थित होते.

> **या ठिकाणी अधिकाऱ्यांनी येणाऱ्या ग्राहकांसोबत सन्मानाने वागावे काही अधिकारी सन्मानाने वागत दिसत नाही असंच जर चालू राहिलं तर यांना जनता काय असते व ती काय करू शकते. हे दाखवून देतील, असे देखील येथील पत्रकारांनी सांगितले.**

> **याबाबत महावितरणाचे उपअभियंता छत्रे यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, आम्ही लवकरच हा प्रश्न निकालात लावण्याचा प्रयत्न करीत आहोत. ग्रामीण भाग असल्याकारणाने वीज केव्हा जाते आणि कुठे जाते हे शोधायला वेळ जातो. मात्र आमचे लाईनमन काम करत असतात. अधिकारी देखील काम करतात, तरी देखील याच्यात अधिक उत्तम काम कसं करता येईल, असे प्रयत्न आम्ही करणार असल्याचे त्यांनी सांगितले.**

# अनेक तक्रारी करून देखील पालिकेचा कानाडोळा

**। नेरळ । वार्ताहर ।**




कर्जत शहरातील मार्केट यार्ड परिसरात कर्जत नगरपरिषदेने व्यवसाय करणाऱ्या नाका कामगार, अन्य कामगार यांच्यासाठी स्वच्छतागृह बनविण्यात आले होते. त्या स्वच्छता गृहाची स्वच्छता करण्यास कर्जत नगरपरिषदेचे कर्मचारी जात नाहीत आणि त्यामुळे त्या स्वच्छता गृह परिसरात अस्वच्छता पसरली आहे.

दरम्यान, त्या ठिकाणी महिला व्यावसायिक तसेच टेम्पो व्यवहाय करणारे यांची गैरसोय टाळण्यासाठी बांधलेल्या शौचालयाची स्वच्छता करण्याची मागणी व्यवसायिक अरुण देशमुख यांनी केली असून देखील स्वच्छता ठेवली जात नाही.

स्वच्छतेचा पुरस्कार करणाऱ्या कर्जत नगरपरिषदेने शहरातील विविध भागात स्वच्छता गृह उभारली आहेत. शहरातील नागरी भागात व्यवसाय करण्याच्या सोयीसाठी सार्वजनिक शौचालये उभारली आहेत. त्या सर्व शौचालयांची देखरेख आणि स्वच्छताराखणायचेकामपालिकेने कंत्राटदार नेमून दिले आहे. शहरातील आर्थिक उलाढालीचे स्थान असलेल्या मार्केट यार्डमध्ये सार्वजनिक शौचालय आहे. मात्र, त्या शौचालयाच्या समोर गावातच कचऱ्याचे ढीग वाढले आहेत. तर शौचालयाची आतील स्थिती आणखी नाजूक असून त्या ठिकाणी व्यवसाय करणाऱ्यांची गैरसोय होत आहे. दर शनिवारी त्या ठिकाणी आठवडा बाजार भरतो आणि त्यावेळी दिवसभरात किमान दोन हजार लोक खरेदीसाठी येत असतात. त्या सर्वांना सार्वजनिक शौचालयाच्या दुर्गंधीचाही सामना करावा लागतो. त्याचवेळी या आठवडा बाजाराच्या ठिकाणी व्यवसाय करणाऱ्या महिलांची मोठी कुचंबणा स्वच्छता गृह सुस्थित नसल्याने होत आहे.

दुसरीकडे कर्जत शहरातील सामानाची ने आण करण्यासाठी लागणारे टेम्पो याचा भागात पार्क करून ठेवलेले असतात. त्यांना देखील स्वच्छता ग्रहाचा वापर करता येत नाही. देशमुख यांनी कर्जत पालिकेकडे तक्रार केली आहे. मात्र तरी देखील अस्वच्छता कायम असल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे.

## महाविकासचे ढोल बजाओ आंदोलन

**सिंधुदुर्ग :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालयामध्ये ७० टक्क्याहून अधिक पदे रिक्त असल्याने जिल्ह्याची आरोग्य यंत्रणा पूर्णपणे कोलमडली आहे. येथे शिक्षण घेण्याऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य हा चिंतेचा विषय बनला आहे. याबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी तसेच अधिष्ठता यांच्या कार्यपद्धतीचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीच्यावतीने आमदार वैभव नाईक यांच्या नेतृत्वाखाली शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर 'ढोल बजाओ, आरोग्य यंत्रणा सुधारो' आंदोलन करण्यात आले. या ठिकाणी आवश्यक असलेल्या सोयीसुविधा, मशनरी तसेच वैद्यकीय अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी यांची पदे भरलेली नाहीत. याबाबत वैभव नाईक यांनी आवाज उठवून प्रशासनाचे लक्ष वेधले.

## चित्रकला स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**। नेरळ । वार्ताहर ।**

**■ सुमारे ५५० विद्यार्थ्यांचा सहभाग**

कर्जत शहरातील दहिवली येथील यशोदा मंगल सभागृहात एका भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या चित्रकला स्पर्धेत ५५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

कर्जतमधील बालकलाकारांना त्यांच्या कलेला व सुप्त गुणांना वाव देण्यासाठी चित्र रेखाटा, रंग भरा या कल्पनेच्या पंखांशी उंच भरारी घ्या, असे ब्रीद वाक्य असलेल्या चित्रकला स्पर्धे आयोजन केले होते.

या स्पर्धेत पहिली ते दहावीच्या विद्याथ्यर्थ्यांनी साडे पाचशेच्या आसपास सहभाग नोंदविला होता. सदरच्या चित्रकला स्पर्धा पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली. चांगली चित्र रेखटणाऱ्या पहिल्या तीन स्पर्धक बालकलाकारांना पारितोषिके देण्यात आली. परीक्षक म्हणून चित्रकला सुनील परदेशी यांनी काम पाहिले. गट पहिली ते दुसरी प्रथम क्रमांक अर्पिता कोळी, द्वितीय निधी पवार, तृतीय रिदांत महाबळे. गट तिसरी चौथी-प्रथम क्रमांक सायली कोळी, द्वितीय क्रमांक लावण्या चव्हाण, तृतीय साहिल देशमुख.

गट पाचवी ते सातवी-प्रथम क्रमांक देवांश शेळके, द्वितीय आशिष मंडक, तृतीय तन्मय शेठ, गट आठवी ते दहावी- प्रथम क्रमांक प्रतीक पालवे, द्वितीय मुग्धा व्यापारी, तृतीय साक्षी दरेकर यांचा समावेश आहे. सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## डॉ. इस्माईल रहाटविलकर यांना वैद्यकीय सेवा पुरस्कार

**माणगाव :** येथील प्रसिद्ध अल्फा हॉस्पिटलचे डॉ. इस्माईल रहाटविलकर यांना वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल वैद्यकीय सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ. इस्माईल यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

५ ऑक्टोबर २०२४ रोजी कुणबी भवन हॉल निजामपूर रोड माणगाव याठिकाणी तालुका पत्रकार संघाच्या झालेल्या कार्यक्रमात त्यांना सन्मानित करण्यात आले.

डॉ. इस्माईल माणगाव तालुक्यातील साई गावचे सुपुत्र असून त्यांनी आपले वैधकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर सुरुवातीला माणगावात क्रिटीकेअर नावाने रुग्णालय सुरु केले. त्यांनतर त्यांनी माणगाव येथे मोर्बा रोड मार्गावर भव्य अशी इमारत उभारून तेथे अल्फा हॉस्पिटल नावाने आपले रुग्णालय सुरु केले. या रुग्णालयात ते दिवस-रात्र रुग्णांना सेवा देत असतात. त्यांचे हे हॉस्पिटल रायगड जिल्ह्यातील एकमेव हॉस्पिटल असून या हॉस्पिटलमध्ये गंभीर आजार व शस्त्रक्रियांसाठी शासनाची मुख्यमंत्री सहायता निधी उपलब्ध आहे. या सहायता निधीतून या ठिकाणी गंभीर आजारांवर तज्ज्ञ डॉक्टर येऊन रुग्णांवर उपचार करतात. त्यामुळे हे हॉस्पिटल नावारूपाला आले आहे.

आपला वैद्यकीय व्यवसाय सांभाळून डॉ.इस्माईल हे समाजात सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून काम करीत असतात. समाजातील गोरगरीब जनतेला, विध्यार्थ्यांना आपल्या परीने मदतीचा हात देत असतात. त्यांच्या या कार्याची दखल माणगाव तालुका पत्रकार संघाने घेत त्यांना मान्यवरांच्या हस्ते वैद्यकीय सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दरम्यान, डॉ. इस्माईल यांनी या पुरस्काराबद्दल आभार व्यक्त केले.

## राजिप शाळा वडगाव रायगड जिल्ह्यात प्रथम



**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

**■ मुंबई विभागात द्वितीय क्रमांक**

रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव जिल्ह्यात प्रथम, तर मुंबई विभागात द्वितीय क्रमांकावर यशस्वी पणे उतुंग झेप घेतली. विविध उपक्रम राबवून या शाळेमध्ये अमुलाग्र बदल घडविला त्याच बरोबर विद्यार्थ्यांची पट संख्येचा अलेख वाढत चालला असून, शाळेमध्ये डिजिटल स्वरुपात, शिक्षण, मतदान गुढी, कंपोस्ट खत या सर्व तत्वाचा आभ्यास करुन महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग, मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या निष्कर्षावर या शाळेला शिक्षक, शालेय कमिटी यांना शालेय शिक्षण मंत्री दिपक केसरकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व धनादेश देवून गौरविण्यात आले.

हा पुरस्कार सोहळा मुंबई येथे संपन्न झाला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिक्षण सचिव कुंदन, शिक्षण आयुक्त सुरज म ांढरे शिक्षणाधिकारी पुनीता गुरव यांच्यासह अन्य उपस्थित होते.

## आयटीआय'ला डॉ. आंबेडकरांचे नाव द्या

**मंडणगड :** तालुक्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या नामांतराला विरोध करत तालुक्यातील विविध सामाजिक संघटना व राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे हरकत घेतली आहे. तालुक्यात सुरू असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे, अशी मागणी केली आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (ए) मंडणगड तालुका शाखेतर्फे मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. त्यानंतर समाजसुधारकांची नावे देण्याचा निर्णय घेतला आहे.

## महिलेचा प्रामाणिकपणा, सोन्याचा हार केला परत

**। चिरनेर । वार्ताहर ।**



उरण तालुक्यातील खोपटे गावातील द.पी.पाडा येथील श्रीकृष्ण गणेश मंडळाच्या गणपती विसर्जन मिरवणुकीत महिलेच्या गळ्यातील सोन्याचा हार तुटून गहाळ झाला होता. हा अडीच तोळ्याचा सोन्याचा हार याच खोपटे गावातील शेवंता अशोक ठाकूर या महिलेला सापडला होता. या महिलेने प्रामाणिकपणे सोन्याचा हार परत केला. त्यामुळे या महिलेच्या प्रामाणिकपणाचे खोपटे परिसरात कौतुक होत आहे. खोपटे गावातील सामाजिक कार्यकर्ते अनंत ठाकूर यांच्या सुनबाई आरती ठाकूर या महिलेच्या गळ्यातील हा सोन्याचा हार होता. सोन्याचा हार परत केल्यामुळे आरती ठाकूर आणि त्यांच्या कुटुंबीयांनी शेवंता ठाकूर यांच्या प्रामाणिकपणाचे म नापासून आभार मानले. श्रीकृष्ण गणेश मंडळाने शेवंता यांना शाल, श्रीफळ व साडी देऊन सन्मानित केले. याशिवाय रोख रकमेचे पाकीट देण्यात आले होते. मात्र, शेवंता यांनी ते नम्रपणे नाकारले. त्यांनी फक्त शाल श्रीफळ साडीचाच स्वीकार केला. यावेळी खोपटे येथील गाव अध्यक्ष यशवंत ठाकूर, कल्पेश ठाकूर आदी उपस्थित होते.

## कामगार नेते महेंद्र घरत यांची जागतिक भरारी!



**। उरण । वार्ताहर ।**

**■ आयएफटीच्या जागतिक संघटनेवर सदस्यपदी निवड**

जगातील १६० देश सभासद असलेल्या इंटरनॅशनल ट्रान्सपोर्ट वर्कर्स फेडरेशन (आयएफटी) लंडन या बहुराष्ट्रीय संघटनेचे अधिवेशन १२ ते १९ ऑक्टोबर रोजी मोरोको येथे सुरु आहे. दिनांक १३ ऑक्टोबर रोजी या बहुराष्ट्रीय संघटनेच्या जागतिक कार्यकारिणीची निवडणूक पार पडली. या निवडणुकीत भारत देशातून कामगार नेते महेंद्र घरत यांची एक्सिक्युटीव्ह सदस्यपदी निवड करण्यात आली. जिथे भारतीयांना प्रतिनिधीत्व मिळत नव्हते तिथे महेंद्र घरत यांनी भारतीयांचा झेंडा रोवला आहे.

# पनवेलच्या रस्त्याचा वाजलाय बँडबाजा

**। पनवेल । वार्ताहर ।**

**■ शेकापचे महादेव वाघमारे यांचे आंदोलन**



पुरे झाला भूमिपूजनाचा गाजावाजा इथे पनवेलच्या रस्त्याचा वाजलाय बँडबाजा, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या विरोधात शेकाप कार्याध्यक्ष महादेव वाघमारे यांनी खराब रस्त्याबाबत आंदोलन केले. येथील रस्ते लवकर खड्डेमुक्त करा, अशी मागणी करत खड्ड्यांमध्ये झाडे लावून आंदोलन केले.

निवडणुकीचे वेध लागताच पनवेल महानगर पालिका करोडो रुपयाच्या कामाचा शुभारंभ करण्याचा तगदा सुरु केला मात्र, अनेक वर्ष रस्त्याची डागजुजी न केल्याने रस्त्याची भयानक अवस्था झाली आहे. याच रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यातून श्री गणरायाचे आगमन आणि विसर्जन करावे लागले. या खड्ड्यात अनेक अपघात झाले आहेत. काहीना मनके दुःखीचा त्रास सुरु झाला आहे. चाकरमानी याच खड्ड्यातून रिक्षा मधून जातं होते. त्याच खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडीता त्रास मागरिकांना सोसावा लागत आहे. खड्डे मुक्त करण्या करिता कोट्यवधींचा खर्च पालिकेकडून करण्यात आला. शेकापच्यावतीने खांदा वसाहतीच्या मुख्य रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यात झाडे लावण्यात आली.


दरम्यान, याप्रसंगी शेकाप माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील, महिला कार्यकते उपस्थित होते. यावेळी आंदोलकांनी प्रत्येक खड्ड्यांची पूजा करुन प्रशासनाचे लक्ष वेधले.

**कृषी, संस्कृती नैसर्गिक सामाजिक खगोलीय व धार्मिक महत्व**

# कोजागिरी पौर्णिमेची आतुरता

**। पाली । वार्ताहर ।**

**कोजागिरी पौर्णिमा ज्याला शरद पौर्णिमा असेही म्हणतात. हा भारतीय उपखंडातील एक महत्त्वाचा सण आहे. आश्विन महिन्यात मध्यरात्रीला असणाऱ्या पौर्णिमेला कोजागरी पौर्णिमा म्हणतात. या दिवशी चंद्र पूर्णपणे प्रकाशमान असतो आणि त्याचे सौंदर्य विशेषतः पाहण्यासारखे असते. या सणाला कृषी संस्कृतीक, सामाजिक, नैसर्गिक, खगोलीय व धार्मिक दृष्ट्या महत्व देखील आहे.**



या दिवशी चंद्र हा पृथ्वीच्या सर्वात जवळ असतो. ही एक खगोलीय घटना आहे. पूर्ण चंद्राच्या प्रकाशात पाण्यात चंद्राचे प्रतिबिंब पाहण्यासाठी लोक बाहेर पडतात. रायगड जिल्ह्यात या सणाला विशेष महत्त्व आहे. या दिवशी ठिकठिकाणी जागरण करून लोक विविध सांस्कृतिक, सामाजिक व मनोरंजनात्मक उपक्रम राबवितात. शिवाय एकत्र येऊन वेगवेगळे पदार्थ करून खातात. सध्या सर्वांना कोजागिरीचे वेध लागले आहेत. यावेळी दूध, तांदूळ, साखर व इतर पदार्थांचे नैवेद्य अर्पण केले जातात. कधी कधी, पारंपरिक गोड पदार्थ देखील बनवले जातात. कोजागिरी पौर्णिमेचा सण विशेषतः पाण्याचे महत्त्व दर्शवतो तसेच धार्मिक रीतिरिवाज यांचे पालन केले जाते.

**कृषी संस्कृतीमध्ये या दिवसाचे विशेष महत्त्व आहे. शेतकरी वर्गामध्ये हा दिवस उत्साहाने साजरा केला जातो. निसर्गाबद्दल वाटणाऱ्या कृतज्ञतेपोटी कोकणात नवान्न पौर्णिमा म्हणजेच कोजागिरी पौर्णिमा साजरी करण्याची प्रथा आहे. ज्या दिवशी पौर्णिमा पूर्ण होत असेल त्या दिवशी नवान्न पौर्णिमा साजरी केली जाते. या दिवशी बाजारात भाताच्या लोंब्या, कुरडूची फुले, नाचणी, वरी आणि झेंडूची फुले खरेदी करण्यासाठी मोठी गर्दी होते. घरासमोर लावलेल्या भाज्या नवान्न पौर्णिमेला महत्त्वाच्या ठरतात.**

**दूध व पाण्याचे महत्त्व कोजागिरीच्या रात्री पाण्यात चंद्राचे प्रतिबिंब पाहणे अत्यंत शुभ मानले जाते. त्यामुळे लोक नदी, तलाव किंवा समुद्र किनाऱ्यावर जाऊन चंद्राचे दर्शन घेतात. बऱ्याच ठिकाणी रात्री बाराच्या दरम्यान दूध तापवले जाते. त्यात केशर, पिस्ता, बदाम, चारोळी, वेलदोडे, जायफळ, साखर वगैरे गोष्टी घालून लक्ष्मी देवीला नैवेद्य दाखविला जातो. दुधात मध्यरात्री पूर्ण चंद्राची किरणे पडू देतात आणि मग ते आटवलेले दूध सर्वजण फस्त करतात.**

**सामाजिक सलोखा कोजागिरी पौर्णिमेला लोक आवर्जून एकत्र येतात. एकमेकांना गोडधोड वस्तू देतात. शिवाय सोसायटी, आळी, नगर आदी ठिकाणची मंडळी मिळून वेगवेगळे जिन्नस बनवता. आधीच याचे नियोजन केलेले असते. सर्वजण एकत्रीतपणे हा सण साजरा करतात. त्यामुळे समाजामध्ये एकजुटीचा अनुभव मिळतो व सामाजिक सलोखा राहतो. हे चित्र शहर व गावात सर्वत्र पहायला मिळते. यावेळी बच्चे कंपनीची धूम असते. लहान थोर एकत्र येऊन विविध खेळ खेळतात. संगीत खुर्ची, आटापाट्या आदी खेळ खेळले जातात. गप्पा गोष्टी रंगतात, विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. नाचगाणी देखील होतात. काही वेळेला राजकीय नेते व पुढारी देखील आवर्जून उपस्थित राहतात. तसेच काही ठिकाणी प्रबोधनात्मक कार्यक्रम होतात.**

## कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये बहुउद्देशीय इमारतीचे भूमीपूजन

**कर्जत :** येथील सहकार नगरमधील कृषी उत्पन्न बाजार समिती उभारत असलेल्या बहुउद्देशीय इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले. या इमारतीमध्ये गोडाऊन व कार्यालयांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात बहुउद्देशीय इमारतीच्या भूमिपूजन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सचिव सुरेश हजारे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर संचालिका अर्चना शेळके यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश फराट, उपसभापती कृष्णा बदे, माजी सभापती विलास थोरवे, गजानन पेमारे, शरद लाड, विष्णू कालेकर, दिनेश जैन, केतन झांजे, संतोष वैखरे, रमाकांत जाधव, मच्छिंद्र कुलाल, दिलीप शेळके यांच्यासह वासुदेव भोईर, हेमंत ठाकरे आदी उपस्थित होते. एक कोटी दहा लाख रुपये खर्च करून ही इमारत उभारण्यात येणार असल्याचे फराट यांनी सांगितले.

**निवडक**

### वाचन प्रेरणा दिन साजरा

**उरण :** माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १५ ऑक्टोबर २०१५ पासून हा दिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याचे घोषित केले होते. यानुसार अब्दुल कलाम यांच्या जयंतीप्रित्यर्थ यु.ई.एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीमध्ये मंगळवारी (दि.१५) वाचन प्रेरणा दिनानिमित्त पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मिलिंद पाडगांवकर, चंद्रकांत ठक्कर, प्राचार्या, विभाग प्रमुख तसेच पर्यवेक्षिका व शिक्षक उपस्थित होते.

### शेकापचा स्तुत्य उपक्रम

**उरण :** शेतकरी कामगार पक्षाचे खजिनदार प्रीतम म्हात्रे यांच्या सौजन्याने उरण शहरातील भवरा येथील प्रीती अपार्टमेंट, उरण पार्क सोसायटी, संगम अपार्टमेंट मोरा रोड आदी ठिकाणी कचराकुंडीचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी शेकापच्या उरण शहर संघटिका सुप्रिया म्हात्रे, उरण तालुका अल्पसंख्यांक महिला अध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष नहीदा ठाकूर, कामगार वसाहत विभागीय अध्यक्ष सुरेखा महाले, ज्येष्ठ कार्यकर्ते वामन तांडेल, युवा कार्यकर्ता रुपेश सुभाष पाटील, प्रियांका म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

### पालकर दाम्पत्यांचा आदर्श

**श्रीवर्धन :** रायगड जिल्हा ज्येष्ठ नागरिक संघांच्या समन्वय समितीचे अध्यक्ष सुरेश पालकर व त्यांच्या पत्नी सुनिता पालकर यांनी १ ऑक्टोबर रोजी जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून देहदानाचा निर्णय घेतला होता. यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे संबंधितांकडे सुपूर्द करण्यात आली आहेत. धर्मादाय कार्याची सुरुवात स्वतःपासून करावी. या हेतूनेच पालकर दाम्पत्यांनी जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनी देहदानाचा निर्णय घेऊन जगासमोर एक वेगळाच आदर्श ठेवला आहे.

### विद्यार्थ्यांना शैक्षणीक मार्गदर्शन

**श्रीवर्धन :** पोलादपूर तालुक्यातील कापडे बु. येथील श्री वरदायिनी विद्यालय व आकार प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.१३) विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आकार प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय सलागरे व पदाधिकारी यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाच्या ध्यासातून मार्गदर्शन वर्ग घेण्यात आला होतो. यावेळी इ. पाचवी, आठवी स्कॉलरशीप व दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना आवारे, कुमठेकर, जाधव, खैरनार, माळी या शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

### तक्रारीसाठी कॉल सुविधा

**तळा :** महावितरण कंपनीने वीजपुरवठा खंडित झाल्याची तक्रार नोंदविण्यासाठी ग्राहकांना मोबाईलद्वारे कॉल करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. याबद्दल ग्राहकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. मोबाईलद्वारे कॉलची सुविधा ऑक्टोबरपासून ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. विज पुरवठा खंडित झाल्यानंतर तक्रार नोंदणीसाठी ९०२९१६५९७४ या संपर्क क्रमांकावर कॉल करून माहिती देण्यात यावी. माहिती दिल्यानंतर महावितरण तक्रार नोंदवून घेऊन पुढील कार्यवाही सुरू करेल.

# माथेरानकरांची साथ कोणाला ?

## प्रस्थापितांना गाफील ठेवून धक्का देणार

**। माथेरान । वार्ताहर ।**

**विधानसभेच्या निवडणुकांचा ज्वर आता हळूहळू जोर धरू लागला असून माथेरानमध्येही त्याचे वारे फिरू लागले आहेत. परंतु, यावेळी माथेरानकर कोणाला साथ देणार हे मात्र, अजूनही गुलदस्त्यात आहे. तसेच, यावेळी सर्वच उमेदवारांनी माथेरानकरांना जरी आश्वासने दिली असली तरी या निवडणुकीत प्रस्थापितांना गाफील ठेवून धक्का देण्याची तयारी केल्याची चर्चा आहे.**




माथेरानमध्ये विधानसभेच्या निमित्ताने हळूहळू निवडणुकांचे रंग आता भरू लागले आहेत. यानंतर सुद्धा स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका लागणार असल्याने काही काळ भूमिगत झालेले स्वयंघोषित नेते आता हळूहळू दिसू लागले आहेत. यास माथेरानही अपवाद नसून मागील दोन वर्षांपासून भूमिगत झालेल्या काही नेत्यांची आता दर्शने होऊ लागल्याने निवडणुका जवळ आल्या असल्याचे स्थानिकांच्या लक्षात आले आहे.

माथेरान नगरपालिकेचे सभागृह विसर्जित होऊन आता दोन वर्षांपेक्षा अधिक कालावधी लोटला आहे. कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर पुन्हा निवडणुकीचे वारे वाहू लागले होते. या काळात अनेक इच्छूक उमेदवारांचे मतदारांसोबत थेट संबंध येत होते. परंतु, निवडणुका पुढे ढकलल्यानंतर ही सर्व मंडळी गायब झाली होती. यातील काही अपवाद वगळता स्वयंघोषित नेते भूमिगत झाले होते. परंतु, आता विधानसभेच्या निमित्ताने पुन्हा एकदा आपण मतदारांचे कैवारी आहोत, हे दाखविण्याकरता काही जणांची धडपड सुरू झाल्याचे सध्या पहावयला मिळत आहे.

माथेरानमध्ये महत्त्वाचे प्रश्न प्रलंबित असून त्याचा थेट पाठपुरावा करण्यास सर्वच राजकीय पक्ष अपुरे पडले आहेत. माथेरानसाठी महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पर्यायी रस्ता व येथील वाहनस्थळ विकसित करणे, ज्याकडे या दोन वर्षांमध्ये लक्ष दिले गेले नसल्याचे दिसत आहे. स्थानिक तालुका पातळीवरील नेतृत्व व त्यांचे समर्थक मतांच्या राजकारणाकरिता तसेच काही बाहेरील लोकांचे हित जोपासण्यासाठी जाणीवपूर्वक या महत्त्वाच्या विषयांना बगल देत तर नाहीत ना, असा संशय व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, माथेरानकर आगामी विधानसभेच्या निवडणूकीत प्रस्थापितांना मोठा धक्का देणार हे निश्चित मानले जात आहे. याबाबतच्या चर्चा चांगल्याच रंगत आहेत.



## शिक्षकांच्या 'हुंकार' आंदोलनाला यश

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

शिक्षक समन्वय संघाच्या माध्यमातून गेली कित्येक दिवस आझाद मैदानावर शिक्षकांच्या वेतनाच्या मागण्यासाठी हुंकार आंदोलन सुरू होते. मात्र, गुरुवारी (दि.१०) आंदोलनाच्या ५६ व्या दिवशी झालेल्या मंत्रिमंडळ कॅबिनेट बैठकीत शासनाने अंशतः अनुदानित शिक्षक बांधवांना अनुदानाचा टप्पा मंजूर करून खऱ्या अर्थाने शिक्षक बांधवांची विजयादशमी साजरी केली. मात्र, अंशतः अनुदानित शिक्षक शासन निर्णय निर्गमनाच्या प्रतीक्षेत होता. शिक्षक समन्वय संघाचे के.पी. पाटील आणि राहुल कांबळे यांनी जो पर्यंत शासन निर्णय हातात येत नाही, तो पर्यंत हुंकार आंदोलन सुरू राहणार, असा निर्धार करून आझाद मैदानावर ठाण मांडून बसले होते. आंदोलनाच्या ६० व्या दिवशी म्हणजेच सोमवार (ता.१४) हा दिवस महाराष्ट्रातील अंशतः अनुदानित शिक्षकांसाठी हक्काच्या वेतनाचा दिवस ठरला. कारण या दिवशी आपल्या हक्काचा पगार मिळणारा असल्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

## सुधागडात दसरा मेळावा उत्साहात

**। पाली । वार्ताहर ।**




आपल्या संस्कृतीत प्रत्येक सणाला महत्व आहे. दसऱ्याला धार्मिक महत्वासोबत आपल्या शेतकऱ्यांच्या घरातील कडधान्याचे बीज परीक्षण करण्यासाठी घट बसविणे खूप उपयोगी व गरजेचे आहे. याचा अवलंब शेतकऱ्यांनी करावा व दसरा सणाच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्यातील रावण म्हणजे वाईट गोष्टींचा नाश करून एक चांगला माणूस बनण्याचा संकल्प करावा, असे आवाहन सुधागड तालुका मराठा समाजाचे अध्यक्ष धनंजय साजेकर यांनी केले आहे.

मराठा समाजाचा दसरा मेळावा शनिवारी (दि.१२) पालीतील मराठा समाज भवनातील स्व.स.स.साजेकर सभागृहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी समाज बंधू भगिनींना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, हा दिवस सिमोल्लंघनाचा दिवस आहे. समाज वेगवेगळ्या क्षेत्रात सिमोल्लंघन करत आहे. समाजातील अनिष्ट चाली-रिती बंद करून काही नवीन बदल करण्याची आवश्यकता आहे. यासाठी सर्व समाज बंधू-भगिनींनी सहकार्य करावे व समाजाला प्रगती पथावर घेऊन जाण्यासाठी योगदान द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी माजी अध्यक्ष गणपत सितापराव, खजिनदार योगेश मोरे, कवी जाधव व जयश्री जाधव यांच्यासह झाप विभागातील सर्व मराठा बांधव उपस्थित होते.

## स्वदेस फाऊंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

स्वदेस फाऊंडेशनतर्फे बारावी पास झालेल्या विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना आणली आहे. यामुळे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणाचे स्वप्न साकार होणार आहे.

रॉनी स्क्रूवाला व झरीना स्क्रूवाला यांच्या स्वदेस फाऊंडेशन संस्थेच्यावतीने रायगड जिल्ह्यामधील माणगाव, तळा, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर व सुधागड या तालुक्यामध्ये ग्रामीण सक्षमीकरणाचे प्रकल्प गाव विकास समितीच्या सहकाऱ्याने राबविले जात आहेत. स्वदेस शिष्यवृत्ती योजना हा या उपक्रमाचाच एक भाग आहे. मागील अनेक शैक्षणिक वर्षांमध्ये स्वदेसच्या मदतीने ५५४ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देऊन त्यांची उच्य शिक्षणाची स्वप्न पूर्ण करण्यासाठी मदत केली आहे. स्वदेसमार्फत आव्हान करण्यात आले आहे की, जे गरीब आणि होतकरू विद्यार्थी आहेत. त्यांनी या शिष्यवृत्तीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी तालुका प्रतिनिधी म्हसळा, सुधागड, श्रीवर्धन- राकेश पवार ८६६८६३७७१३, महाड, पोलादपूर- विनोद पाटील ९२७२००६७४३ व माणगाव, तळा- दीप्ती खैरे ९१४५९२३४०१ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## काऊंसिल ऑफ आर्किटेक्चर अवॉर्ड्स



**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी येथील महात्मा एज्युकेशन सोसायटीच्या पिल्लई एचओसी कॉलेज ऑफ आर्किटेक्चरने प्रतिष्ठित काऊंसिल ऑफ आर्किटेक्चर अवॉर्ड्स फॉर एक्सलन्स इन आर्किटेक्चरल थीसिस आणि एक्सलन्स इन डॉक्युमेंटेशन ऑफ आर्किटेक्चरल हेरिटेजचे आयोजन केले होते. यात मुंबई, ठाणे, नवी मुंबई, नाशिक, पुणे, बारामती, औरंगाबाद येथील सुमारे ५८ कॉलेजचा समावेश होता. हा तीन दिवसीय कार्यक्रम रसायनी पिल्लई कॅम्पसमध्ये आयोजित करण्यात आला होता.

स्पर्धेच्या सर्व श्रेणींमध्ये सुमारे १३९ नोंदणी झाली होती. इव्हेंटमध्ये अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या प्रबंध कार्याचे प्रदर्शन समाविष्ट होते. प्रत्येक सहभागी महाविद्यालयाने स्पर्धेसाठी त्यांच्या सर्वोत्कृष्ट प्रवेशिका पाठवल्या होत्या. १० निवडलेल्या विद्यार्थ्यांचे सार्वजनिक सादरीकरण आणि शैक्षणिक आणि सराव आर्किटेक्ट्सचे ज्युरी मूल्यांकन झाले. ज्युरीमध्ये हैदराबादचे आर्किटेक्ट राम मोहन राव, आर्किटेक्ट मीता जैन, आर्किटेक्ट नागेश एचडी यांसारख्या प्रख्यात वास्तुविशारदांचा समावेश होता.

## विशेष मुलांच्या कलागुणांना वाव

**। उरण । वार्ताहर ।**

उरण नगरपरिषद हद्दीतील बोरी नाका येथील स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठानतर्फे चालवित असलेल्या सीबर्ड स्वीकार विशेष मुलांच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी दिवाळीसाठी आकर्षक पणत्या बनविल्या आहेत. या पणत्या २० ते १०० रुपये दोन नग दराने विकल्या जात आहेत. तसेच, सुगंधी उटणे ५ ग्राम १५ रुपये पाकीट अशा दराने विकले जात आहे. या शाळेतील विद्यार्थी दरवर्षी राख्या, पणत्या, तोरणं, पाकीट, आहेर पाकीट, कागदी पिशव्या बनवित असतात. विशेष मुलांनी तयार केलेल्या वस्तूंना सेंटमेरी, ओएनजीसी, युईएस, द नर्चरिंग रूट, डीपी वर्ड कंपनी यांच्याकडून मागणी असते. शाळेच्या सुपरवायझर माधुरी उपाध्ये, पल्लवी परदेशी, मानसी पांचाळ, राकेश म्हात्रे, प्रशांत कदम यांनी विशेष सहकार्य केले आहे.





● दीपावलीत लहान मुले छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांच्या प्रतिकृती उभारत असतात. या करता त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांसह मावळ्यांच्या प्रतिकृतींची गरज भासत असते. पनवेलच्या कुंभार वाड्यात छत्रपती शिवाजी महाराज, मावळे व किल्ल्यांच्या मातीच्या प्रतिकृती बनवण्याचे काम जोरदार सुरु आहे. (छायाचित्र- राजेश डांगळे)

## खरोशी येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**। खरोशी । वार्ताहर ।**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अलिबाग आणि ग्रामपंचायत खरोशी यांच्यावतीने विनामूल्य सामुदायिक आरोग्य शिबिराचे आयोजन मंगळवारी (दि.१५) खरोशी गावामध्ये करण्यात आले होते. या शिबिराला ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

या आरोग्य शिबिराचे उद्घाटन सरपंच रुपाली पाटील, प्रणाली घरत, सदस्य तसेच डॉ. पूर्वा पाटील, डॉ. देवदत्त सूर्यवंशी, डॉ. कल्पना रक्षित, डॉ. रवि वराट, डॉ. युवराज, डॉ. अलीशा. डॉ. सुमीत, डॉ. शकीला, समाजसेवा अधीक्षक स्टाफ नर्स आदि उपस्थित होते.

## हिमाली मोकलची अधिकारीपदी नियुक्ती

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर गावातील हिमाली काशिनाथ मोकल हिची तालुका कृषी अधिकारी (तंत्र अधिकारी) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय अलिबाग-रायगड येथे मंगळवारी (दि.१५) आपल्या पदाचा पदभार स्वीकारून, कामकाजाला सुरुवात केली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्यावतीने घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षेत २०२१ मध्ये, चिरनेर येथील हिमाली काशिनाथ मोकल हिची तालुका कृषी अधिकारी गट 'ब' वरिष्ठ राजपत्रित अधिकारी म्हणून निवड झाली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारसीनुसार खुल्या गटातून विभागीय संवर्ग वाटप नियमानुसार मिळालेल्या महसूल विभाग कोकण-२ साठी हिमाली मोकल यांची निवड करण्यात आली. आआली आहे.



**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● **वर्कशॉपमध्ये मशिन ऑपरेटर आणि सुपरवाईझर** पाहिजेत शिक्षण १५ वी पास प्रशिक्षण दिले जाईल. ठिकाण बामणसुरे, चोंढी नंबर - ९१४५४५०२९७/९५७९२५८८९२.

● **वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत** १० वी १२ वी पास/ नापास पगार १२००० रूपये १२ तास ड्युटी ठिकाण-बामणसुरे, चोंढी नंबर-९१४५४५०२९७/९५७९२५८८९२

● **नागाव येथे कामासाठी बाई** ची आवश्यकता. घरकाम व मुलाला सांभाळणे. पगार- १२,०००/- संपर्क- ७८७५८६६५५५

● **Freshers पाहिजेत** : रायगड जिल्ह्यातील अनअनुभवी / नवोदित पुरुष शिक्षकांना अलिबाग येथे पूर्ण वेळ नोकरीची संधी. पात्रता : BA / MA B.Ed, BSc / MSc B.Ed, B.E. / B.Tech पगार : रु. २०,०००/- पर्यंत. अर्ज करा- honestefforts1012@gmail.com

● **अलिबाग रेवस रोड येथे चायनीज/हॉटेल** त्वरीत स्वरूपात चालवायला देणे आहे. ७५०७३०१३५१, ९२७०४९८०९९

● फ्लॅट शोधत आहात? नवीन 2BHK प्रशस्त फ्लॅट विकणे आहे. ठिकाण : मोक्याच्या जागी, अलिबाग. अपेक्षित किंमत ८१ लाख, निगोशिएनल संपर्क :- ८२७५११९८८३.

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

### सत्यशोधक वारकरी महासंघाचा पुढाकार

# शोध जिजाऊ, सावित्रीच्या लेकींचा

**। वावोशी । वार्ताहर ।**

**रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात नवरात्री उत्सवाच्या निमित्ताने सत्यशोधक वारकरी महासंघाच्यावतीने 'शोध जिजाऊ-सावित्रीच्या लेकींचा' हा अभिनव उपक्रम राबवण्यात आला. महिलांना जिजाऊ माँ साहेब आणि सावित्रीबाई फुले यांच्या विचारांशी जोडणे आणि त्यांच्यातील नेतृत्वगुणांना चालना देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.**

या उत्सवात 'गरबा नृत्य' झाल्यानंतर महिलांसाठी एक विशेष प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली होती. या प्रश्नमंजुषेत सावित्रीबाई फुले व जिजाऊ माँ साहेब यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रश्न विचारण्यात आले होते. प्रत्येक प्रश्नासाठी एक गुण दिला गेला व यातून सहभागी महिलांपैकी प्रथम, द्वितीय, आणि तृतीय क्रमांकाची विजेती निवडण्यात आली. विजेत्या महिलांचा पैठणी, साडी आणि इतर उपहार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी या उपक्रमात विजेत्या महिलांचे कौतुक देखील करण्यात आले. या उपक्रमात प्रथम क्रमांक मिळालेल्या नीलम गोळे यांना पैठणी साडी, द्वितीय क्रमांक निकीता भगत यांना साडी व तृतीय क्रमांक किशोरी पोंगडे यांना सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आले. शिवाय सर्व सहभागी महिलांना उत्तेजनार्थ भेटवस्तू देण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सत्यशोधक वारकरी महासंघ आणि विनायक अपार्मेंटमधील सर्व सभासदांनी मोलाचे योगदान दिले. या उपक्रमात कृष्णा ठाकूर, निखिल भगत, निशा येलवे, रूक्मिणी सावंत, माला सिंग, निशा हुले, अनिता गिरी, शिला चव्हाण, अनिता ठाकूर,



श्रीकृष्ण ठाकूर, चंद्रकांत येलवे, विश्वास कदम, लक्ष्मण चव्हाण, नितेश भगत, अविनाश झोरे, माधव सानप आदींचे सहकार्य लाभले.

> **उपक्रमाचा मुख्य हेतू महिलांना सावित्रीबाई फुले आणि जिजाऊ माँ साहेब यांच्या जीवनकार्याचा परिचय करून देणे तसेच त्यांच्या विचारांची प्रेरणा घेण्यास प्रवृत्त करणे हा होता. महिलांच्या जीवनात शिक्षण, आत्मनिर्भरता आणि सामाजिक परिवर्तनाची भूमिका किती महत्त्वाची आहे. याची जाणीव या उपक्रमातून करून देण्यात आली.**
> **– महेश पोंगडे महाराज, सत्यशोधक वारकरी महासंघ**

## जाहीर नोटीस

पेण येथील मे तहसीलदार तथा न्यायदंडाधिकारी सो. यांचे कोर्टात

श्री. सुमा धर्मा कोळी
सुजीता धर्मा कोळी — अर्जदार
रा.रोडे पो. कांदळेपाडा ता.पेण जि.रायगड

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत रोडे — सामनेवाला

सर्व तमाम जनतेस कळविण्यांत येते की, अर्जदार यांच्या मुलीच्या जन्म मौजे रोडे ता.पेण, जि. रायगड येथे दि. ०५/०४/१९८८ रोजी झालेला असल्याने त्यांच्या जन्म तारखेची नोंद ग्रुप ग्रामपंचायत रोडे यांचे कार्यालयांतील जन्म नोंद रजिस्टरला नोंद करणेबाबत सदरचा अर्ज कोर्टात दाखल केलेला आहे.

तरी सदर अर्जास कोणाचीही हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाचे मुदतीत आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह मे कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचा अर्ज मागणी प्रमाणे मंजूर करण्याचे आदेश पारित करण्यात येतील व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. यांची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस माझ्या सही शिक्यानिशी आज दि. ३०/०८/२०२४ रोजीचे सही ने दिली.

सही
**(तानाजी शेजाळ)**
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी पेण

---

जावक क्रमांक/ नोंदणी शाखा २३७१/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रायगड
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, रायगड विभाग, कल्पतरु
इमारत, मुख्य पोस्ट ऑफीस जवळ,
अलिबाग, रायगड, रायगड, रायगड,रायगड
दि १५/१०/२०२४

चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन. क्रमांक: RGD/१४१८८/१८/२४
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक : ४०२/२४
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक इल अन नूर फाउंडेशन बाबत ।
न्यासाचा पत्ता :- शॉप नं ४ प्लाट नं ३, सेक्टर ३५ एफ, खारघर, रायगड, पनवेल, खारघर (सीटी)
अर्जदार मोहम्मद अयाज सरदार,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १. | CASH | ९००९.०० |

(अ) जंगम मिळकतः- रोख रु. ९००९/- मात्र
(अक्षरी रुपये नऊ हजार नऊ मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|

(ब) स्थावर मिळकत :- रोख रु. /- मात्र
(अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक १५-१०-२०२४ रोजी दिली.

सही/-
**अधिक्षक (प्र)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**रायगड**

---

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिल कलायसेल्वी श्रीनिवासा रामानुजर रा. प्लॉट नं. ४६७ /अ, वोरा भुवन, फ्लॅट नं.३०३, तिसरा मजला, डॉ. आंबेडकर रोड, महेश्वरी उद्यान जवळ, माटुंगा (पुर्व), मुंबई-४०००१९ यांनी खालील वर्णनाची मिळकत, खालील मालकांकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरवले आहे. तसा जमिन मालकांबरोबर दि.१८/०४/२०२४ रोजी साठेकरारसुध्दा केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (चौ. मीटर) | आकार (रू.पै.) | मालकांचे नांव |
|---|---|---|---|---|
| शिरढोण, ता.पनवेल, जि. रायगड. | १८८/४ | ३३-७०-०० | ३३७ | १. मिर्जा असलम रशिद बेग<br>२. मिर्जा सोहेल रशिद बेग |

सदरहू मिळकतीपैकी मिर्जा असलम रशिद बेग यांच्या हिश्श्याची १६-८५-०० चौ. मीटर इतक्या क्षेत्राच्या मिळकतीसंदर्भात झालेला साठेकरार हा या नोटीशीचा विषय आहे.

आमच्या अशिलांनी मिर्जा असलम रशिद बेग रा.न्यु ओशन व्ह्यू, २९ बी, जे.पी.रोड, दर्ग्याच्या बाजूला, वर्सोवा, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००६१ यांच्या बरोबर दि.१८/०४/२०२४ रोजी साठेकरार केला, त्यावेळी मिळकतीच्या विक्रीच्या एकूण रक्कमेपैकी १०% इतकी रक्कम बयाणा म्हणून मिर्जा असलम रशिद बेग यांना दिलेली आहे. साठेकरारात मिळकतीचे खरेदीखत करण्याविषयी अटी व शर्ती ठरलेल्या आहेत. अटी व शर्तीनुसार जमिन मालक मिर्जा असलम रशिद बेग यांनी १६-८५-०० चौ. मीटर इतक्या क्षेत्राचा स्वतंत्र ७/१२ करण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. तसेच १६-८५-०० चौ. मीटर इतक्या क्षेत्रास कुंपण करुन देण्याचेसुध्दा ठरले आहे. तसेच मिळकतीचे सहमालक मिर्जा सोहेल रशिद बेग यांच्याबरोबर मिळकतीच्या क्षेत्राविषयी काही वाद असल्यास त्याचे निवारण करुन देण्याचेसुध्दा खरेदीखत नोंदणीकृत करण्यापुर्वी ठरलेले आहे. आमचे अशिल हे दि.१८/०४/२०२४ पासून साठेकरारात ठरलेल्या अटी व शर्तीनुसार मिळकत विकत घेण्यासाठी सदैव तयार होते व आजही तयार आहेत. दि.१८/०४/२०२४ रोजीच्या साठेकराराची पुर्तता करण्याची मुदत ही जमिनीचे मालक मिर्जा असलम रशिद बेग यांनी लिहून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करेपर्यंत राहील व त्याची संपुर्ण जबाबदारी ही जमिन मालक यांचीच ठरलेली आहे.

असे असताना मिर्जा असलम रशिद बेग हे दि.१८/०४/२०२४ रोजी झालेल्या साठेकरारातील अटी व शर्तीचे उल्लंघन करुन मिळकत ही त्रयस्थ इसमांस विकण्याच्या विचारात आहेत असे आमच्या अशिलांस खात्रीलायक समजले.

तरी तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे शिरढोण, ता.पनवेल, जि. रायगड येथील गट नं. ११८/४, एकूण क्षेत्र ३३-७०-०० चौ.मी. या मिळकतीपैकी मिर्जा असलम रशिद बेग यांच्या मालकीच्या १६-८५-०० चौ.मीटर इतक्या क्षेत्राच्या मिळकतीसंदर्भात कुणीही कोणत्याही प्रकारचा खरेदीविक्रीचा अथवा हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. तसे केल्यास तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच आमचे अशिल हे दि.१८/०४/२०२४ रोजी झालेल्या साठेकराराच्या अनुषंगाने कराराची पुर्तता करण्याकरीता पनवेल येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात दावा दाखल करणार आहेत याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : १५/१०/२०२४

**ॲड. सुनिल के. वाकडे**
डी-१, तळमजला,
हिराबाग को.ऑप. हौ. सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता.अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ९८६७७१५५२४

---

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
## (तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)
## जाहिर नोटीस

ज.म. र अर्ज ६४/२०२४

प्रति,
श्री. जनार्दन सिताराम भोईर
मु. पो. चौल, सराई, — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत चौल,
ता. अलिबाग, जि. रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे चौल, सराई येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे वडील कै. सिताराम गणपत भोईर यांचा मृत्यु दि. २५/१०/१९९३ रोजी मौजे चौल, सराई, ता. अलिबाग येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत चौल येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत चौल यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.१५/१०/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारिख : १५/१०/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

---

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. प्रदिप जगदिश सक्सेना व सौ. सुनिता प्रदिप सक्सेना दोघेही रा. 'बसेरा' पेट्रोलपंपा समोर, कनकेश्वर फाटा, ता.अलिबाग, जि. रायगड व रा. २, पुर्णिमा बिल्डिंग, पटेल कंम्पाऊंड, नेपियन सी रोडच्या समोर, मुंबई ४००००७ यांची खालील वर्णनाची सामाईक मालकीची मिळकत आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| गुंजिस ता.अलिबाग, जि.रायगड | ९/१/२ | ०-६६-१०<br>पो.ख.०-०४-००<br>एकूण ०-७०-१० | ३.४९ |

सदरहू मिळकत ही आमच्या अशिलांनी दि. २८/०८/१९९८ रोजी दस्त क्र.१२४१/१९९८ ने मिळकतीचे मालक श्री. आलोक अमत्यकुमार गांगुली यांच्याकडून कायम खरेदीखताने विकत घेतलेली आहे. खरेदीखत दस्त क्र. १२४१/१९९८ मध्ये दि. ०७/११/१९९८ रोजी दुरुस्ती करुन दस्त क्र. १४६९/१९९८ ने नोंदणीकृत केलेले आहे.

दस्त क्र.१२४१/१९९८ व दस्त क्र. १४६९/१९९८ हे दोनही नोंदणीकृत दस्त आमच्या अशिलांकडून कनकेश्वर फाटा ते अलिबाग येथे प्रवास करताना माहे जानेवारी २०२४ मध्ये प्रवासामध्ये गहाळ झालेले आहेत. त्यांचा त्यांनी शोध घेवूनही दोनही दस्त अद्याप सापडलेले नाहीत. सदरहू दोनही दस्तांचा दुरुपयोग होवू नये म्हणून आमच्या अशिलांनी अलिबाग पोलिस स्टेशन येथे तक्रारसुध्दा नोंदविलेली आहे.

दस्त क्र.१२४१/१९९८ व दस्त क्र. १४६९/१९९८ हे दोनही दस्त कोणाला सापडल्यास ते खाली सही करणार अथवा मुळ मालक यांच्याकडे सुपुर्त करावे. तसेच तमाम जनतेस कळविण्यात येते की, सदरहू दस्ताचा कोणीही दुरुपयोग करु नये. दस्ताच्या अनुषंगाने वर नमुद मिळकतीसंबंधी त्रयस्थ इसमांनी काही गैर व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १५/१०/२०२४

**ॲड. सुनिल के.वाकडे**
डी-१. तळमजला.
हिराबाग को.ऑप.हौ.सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग.
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. नं. ९८६७७१५५२४

---

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given that my clients Mr.Pradeep Jagdish Saxena and Mrs.Sunita Pradeep Saxena both R/o. 'Basera', Near Petrol Pumb, Kankeshwar Phata, Tal.Alibag, Dist. Raigad and R/o.2, Purnima Building, Patel Compound, Opposite Nepean Sea Road, Mumbai-400007, who are the Owners of the land and house properties more particularly described in the Schedule hereunder, have clear and marketable title to the said Land and houses and the said properties are free from all encumbrances and reasonable claims and doubts.

Any persons having any claim against or in respect of the said land and house properties or any part thereof by way of sale, mortgage, exchange, charge, lease, lien, inheritance, gift, trust, maintenance, possession, easement or otherwise are hereby required to make known the same to the undersigned at the address mentioned below latest by 21st day of October 2024, failing which no objections/claims shall be entertained and the claims if any will be deemed waived and/or abandoned.

**THE SCHEDULE ABOVE REFERRED TO**

All that land situated at Village Gunjis, Tal. Alibag, Dist. Raigad and Houses situated ate Village Boris, Tal. Alibag. Dist. Raigad within the jurisdiction of Sub-Registration Alibag

**A) Landed Property :**

| Village | Survey No. | Area (H.A.) | Assessment (Rs.Ps.) |
|---|---|---|---|
| Gunjis, Tal.Alibag, Dist Raigad | 9/1/2 | 0-66-10<br>0-04-00<br>Total 0-70-10 | 3.49 |

**B) House Properties :**

| Village | Gram Panchayat | House No. | Assessment (Rs. Ps.) |
|---|---|---|---|
| Boris, Tal.Alibag Dist.Raigad | Boris-Gunjis, Tal.Alibag, Dist.Raigad | 90 | 23014/- |
| | | 91 | 21436/- |
| | | 181 | 844/- |
| | | 182 | 260/- |
| | | 183 | 884/- |
| | | 184 | 578/- |
| | | 185 | 436/- |
| | | 186 | 1276/- |
| | | 187 | 19556/- |
| | | 188 | 642/- |
| | | 189 | 2868/- |

Alibag
Date: 15/10/2024

**Adv.Sunil K. Wakade**
D-1, Ground Floor,
Hirabaug Co.Op. Hsg.
Society, Behind Sagoon
Hotel, Alibag.
Mob.9867715524

---

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिल श्री. भरत हरिदास महेता मौजे खारपेढांबे, ता. अलिबाग,जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकती, मिळकतीचे विद्यमान मालकांचे मालकीचे क्षेत्र विकत घेण्याचे ठरविलेले आहे. सदरच्या मिळकती निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलास विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | मालकाचे नाव | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| खारपेढांबे ता. अलिबाग | १२७ | श्री. राजाराम अर्जुन पाटील<br>श्री.जयराम अर्जुन पाटील<br>श्री. चंद्रकांत अर्जुन पाटील<br>सौ. भारती रमेश धुमाळ<br>सौ. जयश्री बाळकृष्ण म्हात्रे | ०-३३-७०<br>पो.ख.०-०३-००<br>एकूण ०-३६-७० | ४.०७ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवाव्यात. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बिनजोखमीच्या आहेत. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक :- १५-१०-२०२४

सही/-
**ॲड. मनिष जगन्नाथ पाटील**
बी.ए.एल.एल.बी.
रजि. नं. MAH/5567/2014
जिल्हा सत्र न्यायालय अलिबाग
मो.नं. ८६९८९४०७७६

---

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. प्रदिप जगदिश सक्सेना व सौ. सुनिता प्रदिप सक्सेना दोघेही रा. 'बसेरा' पेट्रोलपंपा समोर, कनकेश्वर फाटा, ता.अलिबाग, जि. रायगड व रा. २, पुर्णिमा बिल्डिंग, पटेल कंम्पाऊंड, नेपियन सी रोडच्या समोर, मुंबई ४००००७ यांच्या खालील वर्णनाच्या सामाईक मालकीच्या मिळकती आहेत.

**अ) जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| गुंजिस ता.अलिबाग, जि.रायगड | ९/१/२ | ०-६६-१०<br>पो.ख. ०-०४-००<br>एकुण ०-७०-१० | ३.४९ |

तसेच सदरहू मिळकतीमध्ये असलेली खालील वर्णनाची घरे :-

**ब) घर मिळकतींचे वर्णन :**

| मौजे | ग्रुप ग्रामपंचायत | घर नं. | असेसमेंट (रू.पै.) |
|---|---|---|---|
| बोरीस, ता.अलिबाग, जि.रायगड | बोरीस-गुंजिस | ९० | २३०१४/- |
| | | ९१ | २१४३६/- |
| | | १८१ | ८४४/- |
| | | १८२ | २६०/- |
| | | १८३ | ८८४/- |
| | | १८४ | ५७८/- |
| | | १८५ | ४३६/- |
| | | १८६ | १२७६/- |
| | | १८७ | १९५५६/- |
| | | १८८ | ६४२/- |
| | | १८९ | २८६८/- |

सदरहू जमिन मिळकतीचे व घर मिळकतीचे श्री.प्रदिप जगदिश सक्सेना व सौ. सुनिता प्रदिप सक्सेना हे सहमालक असून सदरहू मिळकती या त्यांच्या स्वकष्टार्जित आहेत. तसेच मिळकती ह्या निर्विवाद, बोजाविरहीत व मार्केटेबल व क्लिअर आहेत अशा आशयाचा दाखला देण्यास सांगितल्यावरून सदरहू नोटीस ही आमच्या अशिलांच्या सांगण्यावरून प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तरी सदर मिळकतींवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (०७) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतींवर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकती या निर्वेध, बोजाविरहित आहेत असे गृहित धरून सदरहू मिळकती या मार्केटेबल व क्लिअर आहे अशा आशयाचा दाखला दिला जाईल. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १५/१०/२०२४

**ॲड. सुनिल के.वाकडे**
डी-१, तळमजला,
हिराबाग को. ऑप. हौ. सोसायटी.
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. नं. ९८६७७१५५२४

---

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

---

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, श्री. जनार्दन आत्माराम म्हात्रे, राहणार भाल, अलिबाग, रायगड - ४०२ २०७ (मालक) यांनी आमच्या अशिलांना खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत स्पष्ट व विपणनयोग्य हक्कांसहित, कोणत्याही प्रकारचे भार व दाव्यांपासून मुक्त अशा जमिनीची (जमीन) विक्री व हस्तांतरण करण्याचे मान्य केले आहे.

मालकांनी आमच्या अशिलांना असे सादरीकरण दिले आहे की, श्री. नारायण बाळाराम पाटील व श्री. बाळाराम महादेव म्हात्रे यांच्या दरम्यान सदर जमिनीसंदर्भातील नोंदणीकरण क्र. एएलजी/३६९/१९६३ अंतर्गत नोंदणीकृत मूळ विक्री करार दि.३०.०५.१९६३ सापडत नाही व तो मालकांद्वारे सातत्याने शोध घेऊनही ताब्यात नाही.

सर्व व्यक्तींना याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, सदर गहाळ दस्तावेजांच्या आधारावर कोणाही व्यक्तीसमवेत कोणत्याही प्रकारचा करार वा कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. एखाद्या व्यक्तीने यापूर्वीच व्यवहार केलेला असल्यास किंवा करीत असल्यास किंवा सदर जमिनीमध्ये कोणताही हक्क, अधिकार वा हितसंबंध असल्यास त्यांनी अधोहस्ताक्षरितांना खालील निर्देशित पत्त्यावर सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत लिखित स्वरूपात सूचित करावे.

कोणीही व्यक्ती/घटक यांमध्ये अन्य बाबींबरोबरच कोणीही बँक व/वा वित्तीय संस्था व/वा प्राधिकारी यांचा समावेश असेल यांचा सदर मालमत्ता व /वा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात विक्री, हस्तांतरण, विनिमय, अभिहस्तांकन, गहाण, प्रभार, भेट, न्यास, निषेधाज्ञा, स्मारक, उत्तराधिकार, दावा, ताबा, भाडेकरार, उप-भाडेकरार, अनुज्ञप्ती, धारणाधिकार, देखभाल, सुविधाधिकार, इच्छापत्र, मृत्यूपश्चात वारसा, भार, कुटुंब व्यवस्था/तडजोड, कोणत्याही विधि न्यायालयाचा निवाडा वा आदेश, कंत्राटे/करार, विकास हक्क वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही हक्क, अधिकार, लाभ, हितसंबंध, हिस्सा, दावा वा मागणी असल्यास त्यांनी त्यासंदर्भात कागदोपत्री पुराव्यांच्या नोटरीकृत प्रमाणित सत्यापित प्रतींसमवेत अधोहस्ताक्षरितांना खालील निर्देशित पत्त्यावर सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करावे . दावा करण्यात न आल्यास, सदर जमिनीतील अशा कथित दावा वा हितसंबंधांच्या कोणत्याही संदर्भाविना व्यवहार पूर्ण करण्यात येईल व असे दावे सर्व हेतूने व दृष्टीने अधित्यागित समजण्यात येतील व आमच्या अशिलांवर बंधनकारक नसतील.

वरील संदर्भित अनुसूची (जमीन)

पुढील विवरणीत पूर्ण स्वामित्वाच्या शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, जमीन मोजमापित ०-३५-४० एच.आर., गट क्र. १४/२/बी/१, गाव भाल, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र व सीमा पुढीलप्रमाणे :

उत्तरेस वा त्या दिशेस : १२ फूट रुंद अंतर्गत रस्ता
दक्षिणेस वा त्या दिशेस : दामोदर आत्माराम म्हात्रे यांच्या मालकीचा गट क्र. १४/२/बी/२ धारक जमीन.
पूर्वेस वा त्या दिशेस : भाल ग्रामस्थ व गट क्र. १५.
पश्चिमेस वा त्या दिशेस : दामोदर आत्माराम म्हात्रे यांच्या मालकीचा गट क्र. १४/२/बी/२ धारक जमीन.

दिनांक : १४.१०.२०२४

एएके लीगल
सही/-
कु. अझीझा ए. खत्री
वकील व सॉलिसिटर्स
सर विठ्ठलदास चेंबर्स
५०८, ५ वा मजला, १६, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
ई-मेल : aziza@aaklegal.in

---

## महाराष्ट्र शासन
## महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)

Email : mahad.ee@mahapwd.gov.in.Ph.No. (02145) 222167

## निविदा सूचना क्रमांक ७६ सन २०२४-२०२५

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता. महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ हे महाराष्ट्र शासना कडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना दिनांक १२/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक १९/१०/२०२४ रोजी १८.०० वाजेपर्यंत www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व दिनांक २१/१०/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वाजता ऑफलाईन पद्धतीने या कार्यालयात सादर कराव्यात व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो दिनांक २१/१०/२०२४ रोजी १०.०० वाजता उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनुक्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे चिंभावे ग्रा.पं. चिंभावे ता. महाड सुतारकोंड येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड (डोंगरी) | ९७४०३३ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सहा व वरील |
| २ | मौजे कोतुर्डे गवळवाडी येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड (२५१५) | ९५७३०५ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | ग्रामपंचायत लाडवली ता. महाड येथील राजमाता जिजाऊ नगर येथील अंतर्गत रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड (आ.स्था.वि.) | ८४३०४३ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | मौजे साखर खडकवाडी ग्रा.पं. साखर ता. पोलादपूर येथे सामाजिक सभागृह बांधणे, तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड (डोंगरी) | ८१५६९४ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | मौजे देगाव रिपे येथे अंतर्गत रस्ता तयार करणे तालुका माणगाव, जिल्हा रायगड (२५१५) | ८२४८४८ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | मौजे कुर्ते गायकरवाडवाडी येथे रस्ता तयार करणे तालुका महाड, जिल्हा रायगड (२५१५) | ८१३१९३ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | मौजे राजिवली येथे अंतर्गत रस्ता तयार करणे. तालुका माणगाव, जिल्हा रायगड (२५१५) | ८१६२६२ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ८ | मौजे गोवेलेकोंड ता. माणगाव येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड (आ.स्था.वि.) | ५९२५२५ | ६००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ९ | मौजे मुठवली ग्रा.पं. मुठवली येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड (डोंगरी) | १२२१५९५ | १३००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सहा व वरील |
| १० | मौजे आंबिवली खु.ग्रा.पं. आंबिवली ता. महाड येथे सामाजिक सभागृह बांधणे तालुका महाड, जिल्हा रायगड (डोंगरी) | १२१८७७८ | १३००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सहा व वरील |

टिप :- १) तपशिलवार निविदा सूचना https://mahapwd.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/४९२५
दिनांक : ११/१०/२०२४

सही/-
कार्यकारी अभियंता
महाड (सा.बां.) विभाग, महाड

विमाका/कोवि/२०२४-२०२५/२१५

# राज्य सरकारकडून अखेर पदकवीरांचा गौरव

## स्वप्नील कुसाळेला दोन कोटी रुपयांचे पारितोषिक

। मुंबई । वृत्तसंस्था ।

ऑलिम्पिक २०२४ च्या स्पर्धेत स्वप्नील कुसाळे याने दमदार कामगिरी करून कांस्य पदक पटकावून देशाचे नाव उंचावले. मात्र, राज्य सरकारकडून त्याच्या बाबतीत दुजाभाव केला जात आहे. स्वप्निलला राज्य सरकारने किमान पाच कोटी रुपये द्यावेत. त्याला बालेवाडीत फ्लॅटची सुविधा उपलब्ध करून द्यावी, याप्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी स्वप्निलचे वडील सुरेश कुसाळे यांनी पत्रकार परिषदेत केली होती. आता राज्य सरकारने दोन कोटी रुपयाचा धनादेश स्वप्निलला सोपवला आहे.



यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. अजित पवारांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून म्हटले की, पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ५० मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात उत्तम कामगिरी करीत स्वप्नील कुसाळे याने कांस्य पदक जिंकले. यानिमित्ताने अभिनंदनपर स्वप्निलला राज्य सरकारच्यावतीने दोन कोटी रुपयांचा धनादेश देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

स्वप्निलचे वडील सुरेश कुसाळे म्हणाले होते की, स्वप्निलचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जमीन, दागिने विकले. आता त्याचे पुढील ध्येय २०२८ मधील ऑलिम्पिक स्पर्धेचे असून, त्याला सुवर्ण पदक जिंकायचे आहे. सध्या सरकारने कांस्यपदक विजेत्यांसाठी एक कोटी रुपये जाहिर केले आहेत. मात्र, खेळाचा खर्च पाहता ही रक्कम तोकडी आहे. भविष्यातील करिअरसाठी सरकारने स्वप्निलला मोठे आर्थिक पाठबळ द्यावे, अशी मागणी सुरेश यांनी केली होती. स्वप्नील सुरेश कुसाळे या कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील तरुणाने आपल्या मेहनतीच्या जोरावर ऑलिम्पिकपर्यंत मजल मारली. महाराष्ट्रातून पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र ठरलेल्या खेळाडूंना महाराष्ट्र सरकारने पन्नास लाखांची मदत केली होती. स्वप्नील पुण्यातील बालेवाडी येथील क्रीडा संकुलात सराव करत असे. ऑलिम्पिक स्पर्धेत पात्र ठरल्यानंतर तो दिल्ली येथील रेंजवर सरावासाठी गेला होता. स्वप्नील आपल्या सर्वोत्तम खेळांचे चांगले प्रदर्शन करून देशासाठी सुवर्ण पदक मिळवून देईल याची आम्हाला खात्री आहे, असे उद्गार सुरेश व आई सरपंच अनिता कुसाळे यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले होते. मात्र, स्वप्निलला सोनेरी कामगिरी करता आली नसली तरी त्याने ऐतिहासिक कामगिरी केली. स्वप्निलच्या या यशाने कांबळवाडीचे गाव सर्वदूर पसरले आहे.

## भारत-पाकिस्तानमध्ये १९ ऑक्टोबरला टी-२० क्रिकेट सामना



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

क्रिकेटमध्ये काहीही झालं तर भारत पाकिस्तान सामना म्हंटलं की त्याबाबत एक वेगळाच उत्साह असतो. भारत पाकिस्तान हे पारंपरिक प्रतिस्पर्धी आहेत. आशिया कप आणि आयसीसी स्पर्धांमध्येच गेल्या वर्षात आमनेसामने येतात. त्यामुळे या दोन्ही देशातील सामना क्रीडाप्रेमींसाठी पर्वणीच असते. ओमानमध्ये हे दोन दिग्गज संघ आमनेसामने येणार आहेत. मस्कटच्या ओमान क्रिकेट अकादमीत हा सामना होणार आहे. हा सामना एमर्जिंग आशिया कप स्पर्धेत होणार आहे. हा सामना भारत ए आणि पाकिस्तान ए संघात होणार आहे. हा सामना टी फॉर्मेटमध्ये खेळवला जाणार आहे. दोन्ही संघ १९ ऑक्टोबरला आमनेसामने येणार आहेत.

एमर्जिंग आशिया कप स्पर्धेत भारताचं कर्णधारपद तिलक वर्माकडे सोपवण्यात आलं आहे. तिलक वर्मा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४ वनडे आणि १६ टी सामने खेळला आहे. तिलक वर्मासोबत उपकर्णधारपदाची धुरा अभिषेक शर्माच्या खांद्यावर असेल. तर राहुल चहरही या संघात असून त्याच्याकडेही आंतरराष्ट्रीय सामन्यांचा अनुभव आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील सामन्यांचा तीन खेळाडूंना अनुभव आहे. दुसरीकडे संघात असलेल्या उर्वरित खेळाडूंनी आयपीएलमध्ये नशिब आजमावलं आहे. त्यामुळे भारताची मजबूत बाजू एमर्जिंग आशिया कप स्पर्धेत उतरणार आहे.

आयुष बडोनी, रमनदीप सिंह, प्रभसिमरन सिंह, नेहल वढेरा, अनुज रावत, ऋतिक शौकीन, साई किशोर, रासिक सलाम, वैभव अरोरा आणि आकिब खान या आयपीएल खेळलेल्या खेळाडूंचा संघात समावेश आहे. एमर्जिंग आशिया कप स्पर्धा पहिल्यांदाच टी-२० फॉर्मेटमध्ये खेळवली जात आहे. यापूर्वी झालेल्या ५ पर्वात वनडे फॉर्मेट खेळवले गेले होते.

भारत आणि पाकिस्तान हे संघ स्पर्धेतील अ गटात आहेत. तसेच या गटात युएई आणि ओमान हे संघ देखील आहेत. दरम्यान, भारताने २०१३ मध्ये एमर्जिंक आशिया कप जिंकला होता. मागच्या दोन वर्षात पाकिस्तानचा दबदबा दिसला आहे. पाकिस्तान ए संघाने मागच्या पर्वात अंतिम फेरीत भारताला पराभवाची धूळ चारली होती.

## भारत विरुध्द न्यूझीलंड कसोटी आजपासून



। मुंबई । वृत्तसंस्था ।

बांगलादेश विरुद्ध दणदणीत विजय मिळवलेल्या टीम इंडियाची उद्यापासून तुल्यबळ न्यूझीलंड संघा विरुद्ध कसोटी मालिका सुरू होणार आहे. या मालिकेत तीन सामने असून त्यातील पहिला सामना उद्या (ता.१६) बंगळूरूच्या चिन्नस्वामी स्टेडियमवर सुरू होणार आहे. मालिकेतील दुसरा सामना २४ ते २८ ऑक्टोबर दरम्यान पुण्याला तर तिसरा सामना १ नोव्हेंबर ते ५ नोव्हेंबर दरम्यान मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर खेळवण्यात येणार आहे. या मालिकेसाठी दोनही संघांनी कसून तयारी केली आहे. भारत आणि न्यूझीलंड दोन्ही संघांकडे तोलामोलाचे खेळाडू असल्याने कसोटी मालिका रंजक होणार आहे. या मालिकेत भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा याच्याकडे आपला संघातील सहकारी आणि माजी कर्णधार विराट कोहली याचा विक्रम मोडण्याची संधी आहे. न्यूझीलंड विरुद्ध रोहित शर्माकडे एक मोठा विक्रम करण्याची संधी चालून आली आहे. भारतीय संघ जर न्यूझीलंड विरुद्ध तीनही सामने जिंकला, तर रोहित शर्मा विराट कोहलीला मागे टाकेल. भारताचा कसोटी कर्णधार असताना विराट कोहलीने एकूण २२ कसोटी सामन्यांमध्ये संघाचे नेतृत्व केले. त्यापैकी त्याने १४ सामने जिंकले, ७ सामने गमावले तर १ सामना अनिर्णित राहिला.

रोहित शर्मा कसोटीचा कर्णधार झाल्यापासून त्याने आतापर्यंत १८ सामन्यात नेतृत्व केले आहे. त्यापैकी त्याने १२ सामने जिंकले असून ४ सामने गमावले तर २ सामने अनिर्णित राहिले होते.

## इम्पॅक्ट प्लेअरचा नियम अखेर रद्द!

। मुंबई । वृत्तसंस्था ।

भारतात गेल्या दोन वर्षांपासून इम्पॅक्ट प्लेअरचा नियम चर्चेचा विषय ठरला आहे. या नियमावर विराट कोहली, रोहित शर्मासारख्या बड्या खेळाडूंनीही टीका केली होती. मात्र, बीसीसीआयने इंडियन प्रीमियर लीगमध्ये किमान २०२७ पर्यंत तरी हा नियम कायम केला आहे. पण असे असले तरी जिथून या नियमाची सुरुवात झाली होती, त्या सईद मुश्ताक अली टी ट्रॉफी स्पर्धेतून या नियमाला रद्द करण्याचा निर्णय बीसीसीआयने घेतला आहे. त्यामुळे यावर्षी खेळवण्यात येणाऱ्या सईद मुश्ताक अली टी ट्रॉफी स्पर्धेत हा नियम लागू होणार नाही.

यापूर्वी सर्वात आधी सईद मुश्ताक अली टी ट्रॉफी २०२२-२३ स्पर्धेत सर्वात आधी हा नियम लागू केला होता. त्यानंतर आयपीएलमध्येही इम्पॅक्ट प्लेअरचा नियम वापरण्यात आला.पण दोन वर्षांनंतर बीसीसीआयने आता सईद मुश्ताक अली टी ट्रॉफी २०२४ स्पर्धेत मात्र हा नियम वापरण्यात येणार नसल्याचे स्पषट केले आहे. सोमवारी याबाबत बीसीसीआयकडून राज्य संघटनांना कळवण्यात आले आहे. इम्पॅक्ट प्लेअर नियमामुळे एक ज्यादाचा खेळाडू संघांना प्लेइंग इलेव्हनमध्ये खेळवता येत होता. त्यातच नियमानुसार आधी निवडलेल्या प्लेइंग इलेव्हनमध्ये नंतर संघांना कोणताही एक खेळाडू बदलता येत होता. त्यामुळे एकूण १२ खेळाडू एका सामन्यात खेळवण्याची संधी संघांना मिळत होती. या नियमामुळे अष्टपैलू खेळाडूंवर अन्याय होत असल्याच्या प्रतिक्रिया क्रिकेट वर्तुळातून उमटत होत्या. त्याचबरोबर यामुळे क्रिकेटच्या मुख्य खेळाला धक्का बसत असल्याचेही मत काहींनी व्यक्त केले होते. भारताचा कर्णधार रोहित शर्मानेही या नियमामुळे अष्टपैलू खेळाडूंच्या विकासात अडथळा येत असल्याचे मत मांडले होते. अखेर आता सईद मुश्ताक अली टी ट्रॉफीमधून तरी हा नियम काढून टाकण्यात आला आहे.

## भारतीय महिला संघाचं टी-२० वर्ल्डकपमधील आव्हान संपुष्टात

। मुंबई । वृत्तसंस्था ।

युएईत सुरू असलेल्या महिला टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत भारतीय संघाचं आव्हान प्राथमिक फेरीतच संपुष्टात आलं. रविवारी ऑस्ट्रेलियाविरुद्ध निसटत्या पराभवामुळे भारतीय महिला क्रिकेट संघाचा सेमी फायनल प्रवेश पाकिस्तान-न्यूझीलंड यांच्यातील लढतीच्या निर्णयावर अवलंबून होता. या महत्त्वपूर्ण लढतीत न्यूझीलंडने अतिशय व्यावसायिक खेळ करत पाकिस्तानवर ५४ धावांनी विजय मिळवला. या विजयासह न्यूझीलंडने सेमी फायनलमध्ये धडक मारली आहे. पराभवासह पाकिस्तानचं आणि पर्यायाने भारतीय संघाचं



आव्हान संपुष्टात आलं आहे.

वर्ल्डकपच्या सलामीच्या लढतीत भारतीय संघाचा न्यूझीलंडविरुद्ध मोठ्या फरकाने पराभव झाला होता. या दारुण पराभवामुळे भारतीय संघाच्या नेट रनरेटवरही परिणाम झाला होता. भारतीय संघाने पाकिस्तान आणि श्रीलंकेला नमवत पुनरागमन केलं. मात्र, रविवारी झालेल्या लढतीत ऑस्ट्रेलियाने भारताचा पराभव केला. या पराभवामुळे भारतीय संघाचं भवितव्य पाकिस्तानच्या हाती गेलं. न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना ११० धावांची मजल मारली. प्रत्युत्तरादाखल खेळताना पाकिस्तानचा डाव ५६ धावांतच आटोपला. आव्हानात्मक लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानने पहिल्या षटकात सात धावा काढल्या. एडन कार्सनने अलिया रियाझला बाद केलं. मोठा फटका खेळण्याचा अलियाचा प्रयत्न सोफी डेव्हाईनच्या हातात जाऊन विसावला. लिआ ताहूहूने पुढच्याच षटकात मुनीबाला त्रिफळाचीत केलं. डाऊन द ट्रॅक येत मोठा फटका खेळण्याचा तिचा प्रयत्न सपशेल फसला. कार्सनने दुसऱ्या षटकात एकही धाव दिली नाही. फ्रान जोनासने पहिल्याच चेंडूवर सदफ शमासला त्रिफळाचीत केलं. याच षटकाच्या शेवटच्या चेंडूवर चोरटी धाव घेण्याचा प्रयत्न फसला आणि इरम जावेद धावबाद झाली. रोसमेरी मेअरने पहिल्याच षटकात सिदरा अमीनला त्रिफळाचीत केलं. पॉवर प्लेच्या सहा षटकात पाकिस्तानचा निम्मा संघ तंबूत परतला होता.

न्यूझीलंडने अतिशय वेगाने षटकं टाकत पाकिस्तानला विचार करायला उसंतच दिली नाही. निदा दार आणि फातिमा साना यांनी सहाव्या विकेटसाठी २४ धावांची भागीदारी करत डाव सावरला. अमेलिआ केरच्या फसव्या चेंडूवर दार फसली आणि विकेटकीपर गेझने क्षणार्धात बेल्स उडवल्या. तिने ९ धावा केल्या. कार्सनने स्वत:च्याच गोलंदाजीवर अफलातून झेल टिपत ओमामिआ सोहेलला तंबूत परतावलं. चोरटी धाव घेण्याच्या प्रयत्नात सयदा अरुब शहा धावचीत झाली. केरने पाकिस्तानची कर्णधार फातिमा सानाला बाद केलं आणि त्यांच्या विजयाच्या आशा संपुष्टात आल्या. फातिमाने २१ धावा करत एकाकी झुंज दिली. न्यूझीलंडतर्फे अमेलिआ केरने ३ तर एडन कार्सनने २ विकेट्स पटकावल्या. रोसमरी मेअर, लिआ ताहूहू आणि फ्रान जोनास यांनी प्रत्येकी एक विकेट मिळवली. न्यूझीलंडने कास्पारेकच्या ऐवजी जोनासला संधी दिली होती.

## नेमबाज सोनम मस्करने जिंकले रौप्यपदक

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

नेमबाज सोनम उत्तम मस्कर हिने आजपासून सुरू झालेल्या आयएसएसएफ वर्ल्डकप फायनल २०२४ स्पर्धेत भारताला १० मीटर एअर रायफलमध्ये रौप्यपदक जिंकून दिले. २२ वर्षीय सोनमने अंतिम फेरीत २५२.९ गुणांची कमाई करून रौप्यपदकावर नाव कोरले. चीनच्या युटींग हुआंगने सुवर्णपदक जिंकले, तर फ्रान्सच्या ओसिने मुलरला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

सोनम मुळची पुष्पनगर, गारगोटीची रहिवासी आहे. मागील तीन वर्षांपासून तीला रायफलचे वेध लागले होते. आंतरराष्ट्रीय नेमबाज व प्रशिक्षक राधिका




हवालदार-बराले आणि रोहीत हवालदार हे तिला मार्गदर्शन करीत आहे. पहिल्या दिवशी १० मीटर एअर पिस्तूल पुरुष आणि महिलांची फायनल झाली. या वर्ल्ड कप स्पर्धेत ३७ देशांतील जगातील १३१ अव्वल नेमबाजांनी सहभाग घेतला आहे. यामध्ये अनेक ऑलिम्पिक चॅम्पियन्सचा समावेश आहे. प्रत्येक १२ वैयक्तिक ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये वर्षातील सर्वोत्कृष्ट नेमबाज ठरवण्यासाठी ही हंगाम संपणारी स्पर्धा आहे. २३ भारतीय अव्वल नेमबाजांचा समावेश आहे.

## महमुदुल्हाची निवृत्ती

। हैदराबाद । वृत्तसंस्था ।

भारतानेबांगलादेशवरतिसऱ्या टी-२० सामन्यात मोठा विजय साकारला. भारताच्या या दणदणीत विजयानंतर बांगलादेशला अजून एक धक्का बसला आहे. कारण बांगलादेशच्या मॅचविनर खेळाडू महमुदुल्हाने आता टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेली आहे. भारताने तिसऱ्या टी-२० सामन्यात बांगलादेशवर दणदणीत विजय साकारला.

पण बांगलादेशसाठी या सामन्यात मोलाचे योगदान ज्या खेळाडूने दिले होते. त्याने आता निवृत्ती पत्करली आहे. कारण आतापर्यंत या खेळाडूने बांगलादेशला बऱ्याचदा सावरले.

## मेंडिसला ‘प्लेअर ऑफ द मंथ’ पुरस्कार

। मुंबई । वृत्तसंस्था ।

श्रीलंकेच्या स्टार बॅटरनं आणखी एक खास विक्रम आपल्या नावे केला आहे. शतकासह वेगवेगळ्या विक्रमांची बरसात करत सप्टेंबर महिना गाजवणाऱ्या या खेळाडूला आयसीसीचा प्लेयर ऑफ द मंथ पुरस्कार जाहीर झाला आहे.

मागच्या महिन्यातील खेळाडूंनी केलेल्या कामगिरीच्या आधारावर आयसीसीने हा पुरस्कार जाहीर केला आहे. त्यामुळे तो पुरुष गटातून प्लेयर ऑफ द मंथ पुरस्कारचा मानकरी ठरला आहे.

आयसीसी प्लेयर ऑफ द मंथ पुरस्कारासाठी मेंडिसशिवाय श्रीलंकन फिरकीपटू प्रभात जयसूर्या आणि ऑस्ट्रेलियाचा धडाकेबाज फलंदाज ट्रॅविस हेड हे शर्यतीत होते. पण त्यांना मागे टाकत मेंडिसनं मानाच्या आणि प्रतिष्ठित पुरस्कारावर नाव कोरले. विशेष म्हणजे या वर्षात दुसऱ्यांदा त्याला हा पुरस्कार मिळाला आहे. २०२४ या वर्षात दोन वेळा हा पुरस्कार मिळवणारा तो पहिला खेळाडूही ठरला आहे. श्रीलंकेच्या ताफ्यातील कामिंदु मेंडिस याने सप्टेंबर महिना गाजवला होता. न्यूझीलंड विरुद्धच्या घरच्या मैदानातील २ सामन्यांच्या कसोटी मालिकेत त्याने सातत्यपूर्ण खेळीचा नजराणा पेश करत अनेक विक्रम प्रस्थापित केले. या मालिकेत त्याच्या भात्यातून ११४ आणि १८२* धावांची खेळी पाहायला मिळाली होती. श्रीलंकेच्या या फलंदाजाने पदार्पणानंतर सलग आठ कसोटी सामन्यात ५० पेक्षा धावा करण्याचा वर्ल्ड रेकॉर्डही प्रस्थापित केला. एवढेच नाही तर मागील ७५ वर्षात कसोटीत सर्वात जलद १००० धावा करण्याचा पराक्रमही त्याने करून दाखवला.



सप्टेंबर महिन्यात या श्रीलंकन फलंदाजानं ९०.२० च्या सरासरीनं ४५१ धावा केल्या आहेत. कामिंदू मेंडिस याने याआधी मार्चमध्ये या पुरस्कारावर नाव कोरले होते. त्यावेळी त्याने आयर्लंडचा वेगवान गोलंदाज मार्क अडायर आणि न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज मॅट हेन्री यांना मागे टाकले होते. आयसीसीकडून हा पुरस्कार पटकवणारा कामिंदू मेंडिस हा तिसरा श्रीलंकन खेळाडू आहे.

याआधी प्रभात जयसूर्या आणि वानिंदू हसरंगा यांचा या पुरस्काराने सन्मान करण्यात आला आहे. मेंडिसनं या दिग्गजांना मागे टाकून दुसऱ्यांदा या पुरस्कारावर शिक्कामोर्तब केले आहे.

## दिव्या पावराची राज्य महिला फुटबॉल संघात निवड

# सातपुड्यातील आदिवासी तरुणीची गगनभरारी!

। मुंबई । वृत्तसंस्था ।

नंदरबार-सातपुड्यातील दुर्गम भागात राहणाऱ्या दिव्या पावरा या आदिवासी तरुणीची राज्य महिला फुटबॉल संघात निवड झाली आहे. जयपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेसाठी ती रवाना झाली आहे.

तिचे वडील रोजगार सेवक, तर आई स्वयंपाकी म्हणून आश्रमशाळेत काम करते. गरीब कुटुंबातील मुलीची राज्य महिला फुटबॉल संघात निवड झाल्याने सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे. सातपुड्यातील दुर्गम भाग असलेल्या पाचव्या पुड्यात वसलेल्या धडगाव तालुक्यातील सोन खुर्द येथील दिव्या पावरा रहिवाशी आहे. तिचे वडील विजयसिंग आत्माराम पावरा हे ग्रामपंचायतीमध्ये रोजगार सेवक म्हणून काम करतात. तर आई कमल पावरा या स्वयंपाकी म्हणून आश्रम शाळेत काम करतात. चौदाशे लोकसंख्या असलेल्या या सोन खुर्द गावात चौथीपर्यंत दिव्या पावराचे शिक्षण झाले. घरात पाच भावंडांमध्ये दिव्या सर्वात मोठी आहे. पुढील



शिक्षणासाठी तिने छत्रपती संभाजी नगर येथील सैनिकी विद्यालयात प्रवेश घेतला. तेथे शिक्षण घेत असताना तिला फुटबॉलची आवड निर्माण झाली. ती चांगले खेळत असल्याचे पाहून तिची निवड पुणे येथील क्रीडा प्रबोधिनीत झाली. सध्या ती बारावीचे शिक्षण तेथेच घेत आहे. जयपूर येथे १३ ते १७ ऑक्टोबरदरम्यान ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशनच्यावतीने होणाऱ्या महिला राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेत तिची निवड झाली आहे. प्रशिक्षक म्हणून धीरज मिश्रा यांनी मार्गदर्शन केले.

घरची परिस्थिती बेताची होती. वडिलांचे फक्त स्वतःचे घर आहे. जमीन नाही. मात्र, शिक्षणाचे महत्त्व त्यांना समजल्याने त्यांनी तिला पुढील शिक्षणासाठी छत्रपती संभाजीनगर येथे पाठवले. याआधीही दिव्याची सतरा वर्षाच्या आतील संघात निवड झाली होती. या ज्युनियर संघात ती खेळल्यानंतर आता सीनियर संघात तिची निवड झाली आहे. देशासाठी खेळण्याचे तिचे स्वप्न असून, भारतीय संघात स्थान मिळविण्यासाठी अथक प्रयत्न करणार असल्याचे दिव्याने सांगितले.

आई-वडिलांनी आमच्यासाठी खूप कष्ट केले. हासआपेष्टा सहन केल्या आहेत. त्यांचे आणि देशाचे नाव उज्वल करण्याचे माझे स्पप्न आहे. मला माझ्या भावडांना शिकवायचे आहे. यासाठी मी प्रचंड मेहनत करण्यास सदैव तयार असल्याचे दिव्याने स्पष्ट केले.

## पुण्याच्या शौरेन सोमणला दुहेरी मुकुट

। पुणे । वृत्तसंस्था ।

पाचव्या राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत पुण्याच्या शौरेन सोमण याने १५ व १७ वर्षाखालील मुलांच्यागटातविजेतेपदपटकाविले. तसेच मुलांच्या ११ वर्षाखालील गटात पुण्याच्याच ऋग्वेद दांडेकर याला उपविजेतेपद मिळाले. सांगलीतील नवकृष्णा व्हॅली स्कूल, कुपवाड एमआयडीसी येथे महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने सूरज फाऊंडेशन सांगली यांच्यातर्फे ही स्पर्धा खेळवली जात आहे.

मुलांच्या १५ वर्षांखालील गटात पाचव्या मानांकित सोमणने ठाण्याच्या सहाव्या मानांकित प्रतिक तुलसानी याचे आव्हान ९-११,११-६,११-५,११-८ असे मोडून काढले. सोमणने पहिला गेम गमावल्यानंतर टॉप स्पिन फटक्यांचा बहारदार खेळ करत हा सामना जिंकला. त्यानंतर त्याने मुलांच्या १७ वर्षांखालील गटात पुण्याच्याच ईशान खांडेकरला पराभूत केले. या गटात नवव मानांकन मिळालेल्या सोमणने दुसऱ्या मानांकित खांडेकरला १४-१२,११-५,११-९ असे पराभूत करताना अष्टपैलू खेळाचा प्रत्यय घडविला. सोमण सध्या पुण्याच्या एम्स अकादमीत नीरज होनप यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत असून त्याने आत्तापर्यंत जिल्हा आणि राज्यस्तरावर अनेक स्पर्धा जिंकल्या आहेत. मुलांच्या ११ वर्षाखालील गटात पुण्याच्या ऋग्वेद दांडेकरला मात्र उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. त्याला मुंबईच्या यश कोल्हेने ७-११,११-६,११-५, ११-८ असे पराभूत केले. मुलांच्या १३ वर्षाखालील गटात ठाण्याच्या सातव्या मानांकित प्रतिक तुलसानीने अग्रमानांकित आरव होरा याच्यावर ११-८,११-५,११-४ असा सनसनाटी विजय नोंदवित अजिंक्यपद मिळविले. मुलींच्या ११ वर्षांखालील ठाण्याची द्वितीय मानांकित खेळाडू जिनया वधानने नाशिकच्या अग्रमानांकित खेळाडू केशिका पूरकर हिच्यावर १३-११,११-४,११-६ अशी अनपेक्षित मात करत विजेतेपदावर नाव कोरले. १३ वर्षाखालील गटात मुंबईच्या टी एस टी संघाची अग्रमानांकित खेळाडू मायरा सांगळेकरने अंतिम सामना जिंकला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)